रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक १७
www.ramprahar.com

◆ सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## भारत-पाक सीमेवर ५० कोटींचे ड्रग्ज, शस्त्रे जप्त



**बीकानेर :** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर राजस्थानमधील भारत–पाकिस्तान सीमेवर सुरक्षा दलांनी आणि पोलिसांनी तस्करीचा एक अत्यंत मोठा कट उधळून लावला आहे. बीकानेर पोलिसांनी सीमेलगतच्या परिसरात राबवलेल्या विशेष मोहिमेदरम्यान ड्रोनच्या सहाय्याने पाकिस्तानातून भारतात पाठवण्यात आलेले तब्बल ५० कोटी रुपये मूल्याचे १० किलो हेरॉईन, ११ स्वयंचलित शस्त्रे, २२ मॅगझिन आणि १०० हून अधिक जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. पाकिस्तानमधील तस्करांनी ड्रोनचा वापर करून हे ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांचा साठा भारतीय हद्दीत पाडला होता. ही खेप ताब्यात घेण्यासाठी आलेल्या एका संशयिताला पोलिसांनी जागेवरच ताब्यात घेतले आहे. वीरेंद्र सिंह असे या व्यक्तीचे नाव असून तो पाकिस्तानातून ड्रोनद्वारे टाकण्यात आलेला हा माल गोळा करण्यासाठी आला होता. सध्या त्याची कसून चौकशी सुरू आहे.


### अंतरंग

चिरनेरमध्ये चारसूत्री भात लागवडीचे प्रात्यक्षिक/३

भिवंडी दुर्घटनेनंतर नवी मुंबई महापालिका सतर्क/६

तिलक वर्मा दुलीप ट्रॉफीत करणार नेतृत्व/८


### पनवेलमध्ये महाराजस्व समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

# महिला सक्षमीकरणासाठी सरकार कटिबद्ध

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांची ग्वाही

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**महिलांना उद्योजक बनवण्यासाठी राज्यात विविध योजना राबवल्या जात आहेत. राज्यातील महिला लखपती आणि आत्मनिर्भर झाल्या पाहिजेत, हे उद्दिष्ट प्रत्यक्षात उतरवण्याचे कार्य महिला व बालविकास मंत्रालयाच्या माध्यमातून सातत्याने होत आहे, असे प्रतिपादन या खात्याच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी रविवारी (दि.२) पनवेल येथे केले.**






मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने पनवेल विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री साकोरे-बोर्डीकर बोलत होत्या. शिबिराला सुप्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी ना. मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, बळीराजाला बळीराजा म्हणण्याचे दिवस आता गेले असून तो खऱ्या अर्थाने अन्नदाता आहे. त्या अन्नदात्याला स्वावलंबी बनवणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार देशात व राज्यात कार्यरत आहे. शेतकऱ्यांच्या मालाला दरवर्षी हमीभाव वाढवून देण्याचे काम सातत्याने केले जात आहे तसेच तरुणांसाठी रोजगाराच्या विविध संधी आपल्या परिसरात उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे नियोजन सुरू आहे.

राज्यभरात समाधान शिबिराच्या माध्यमातून १० लाख लोकांना लाभ देण्याचे उद्दिष्ट होते, परंतु एकट्या रायगड जिल्ह्यातूनच सव्वादोन लाखांहून अधिक नागरिकांना या शिबिरांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे, याबद्दल मंत्री बोर्डीकर यांनी आनंद व्यक्त केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, आमच्यासारखे कार्यकर्ते हे शासकीय योजना आणि त्यांचे लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी एका पुलाप्रमाणे काम करत आहेत. सरकारने योजना आणल्यानंतर ती लोकांपर्यंत पोहचवणे आणि नागरिकांच्या समस्या सरकारपर्यंत मांडणे यामुळे सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल होत आहे. हे काम केवळ एका दिवसापुरते मर्यादित नसून वर्षाचे ३६५ दिवस सातत्याने सुरू असते. सरकारच्या योजनांचा लाभ थेट ग्रामपंचायतींपर्यंत आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्यासाठी आमचे सर्व लोकप्रतिनिधी तत्पर आहेत.

पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालयात झालेल्या या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, प्राची जाधव, सोनाली जितेकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, आरती काठे, वैशाली सावंत, वर्षा केवाळे, महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक मनोज भुजबळ, रामदास शेवाळे, सुमित झुंजारराव, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, सरपंच सीताराम चौधरी, आनंद ढवळे यांच्यासह लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल मतदारसंघातील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा प्रत्यक्ष लाभ घेत विविध दाखले व शासकीय कामे तत्परतेने पूर्ण झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

### विविध दाखले, लाभाचे वाटप

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या महसूलविषयक विविध तक्रारी व शासकीय कामांचा निपटारा एकाच छताखाली जलद गतीने करण्यात आला. जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, सातबारा उतारे आणि इतर आवश्यक कागदपत्रे तातडीने उपलब्ध करून देत विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मंत्री मेघना बोर्डीकर व अन्य मान्यवरांच्या हस्ते लाभाचे वाटप करण्यात आले.

## नशामुक्त युवा-विकसित भारत संकल्प अभियानाचा शुभारंभ

### तरुणांनो, व्यसनांपासून दूर राहा -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे नशामुक्त युवा फॉर विकसित भारत या संकल्प अभियानाचा शुभारंभ रविवारी (दि.२) करण्यात आला. "तरुणांनी अमली पदार्थांसारख्या हानिकारक व्यसनांपासून दूर राहायला हवे. हेच या मोहिमेचे उद्दिष्ट आहे", असे यावेळी पंतप्रधानांनी नमूद केले.

राज्यासह केंद्र सरकारने तरुणाईला नशामुक्त करण्यासाठी चांगलीच कंबर कसली आहे. सरकारकडून नशामुक्त अभियान हाती घेण्यात आले आहे. अवघ्या काही दिवसांआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ड्रग्ज फ्री मुंबई या अभियानाचा शुभारंभ केला. त्यानंतर आता रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नशामुक्त युवा-विकसित भारत अभियानाची सुरुवात केली. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यांनी या अभियानाचा शुभारंभ केला. देशभरातील तरुणांना अमली पदार्थमुक्त भारत घडवण्याच्या मोहिमेत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे हा या अभियानाचा उद्देश आहे.

व्यसन देशाच्या ताकदीला कमजोर करते. आईवडिलांची स्वप्नेही उद्ध्वस्त करते. व्यसनांमुळे स्वप्नांचा अकाली मृत्यू होतो, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, देशाने विकसित भारताचे ध्येय ठेवले आहे. त्यामुळे देशातील तरुण शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी तसेच आत्मविश्वासपूर्ण असणे आवश्यक आहे.

पंतप्रधान मोदींनी युवकांनी व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. व्यसनमुक्त आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, पालक, स्वयंसेवी संस्था आणि समाजातील सर्व घटकांनी समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकताही त्यांनी अधोरेखित केली.

विकसित भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करताना व्यसनमुक्त, निरोगी आणि सक्षम युवा शक्ती घडविण्याचा संकल्प या अभियानाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला आहे.

## निवडक

### इंडोनेशियात फेरीबोटीला आग; पाच जणांचा मृत्यू, ४१ बेपत्ता


**जकार्ता :** इंडोनेशियातील मदुरा बेटाजवळ रविवारी (दि.२) प्रवाशांनी भरलेल्या एका फेरीबोटीला भीषण आग लागल्याने किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून ४१ जण बेपत्ता आहेत. पूर्व जावा प्रांतातील सुराबाया येथून दक्षिण सुलावेसीतील मकासरकडे चाललेल्या या बोटीमध्ये प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह एकूण २७१ जण प्रवास करत होते. दुपारपर्यंत २२५ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली असून बेपत्ता प्रवाशांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

### नीट पीजी परीक्षेचे पेपर आता होणार एकाच सत्रात

**नवी दिल्ली :** केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या नीट-पीजी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर काही बदल केले आहेत. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना आता दूरच्या परीक्षा केंद्रांवर जाण्याची किंवा ऐनवेळी प्रवासाचे नियोजन करण्याची घाई करावी लागणार नाही. कारण केंद्र निवासस्थानाजवळ उपलब्ध होणार आहे. शिवाय परीक्षा एकाच सत्रात घेतली जाईल. प्रक्रिया पारदर्शक आणि सुरक्षित बनवणे हा यामागचा उद्देश आहे.

## महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**



सक्तीने किंवा फसवून केल्या जाणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे त्याचे कायद्यात रूपांतर झाले आहे.

महाराष्ट्र विधानसभेत मार्च २०२६मध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक पारित करण्यात आले होते. विधान परिषदेतही याला मंजुरी मिळाली. त्यानंतर विधेयक राज्यपाल आणि राष्ट्रपती यांच्या स्वीकृतीसाठी पाठवण्यात आले होते. नव्या कायद्यानुसार राज्यात कोणत्याही व्यक्तीचे बळजबरीने, धमकावून, फसवून किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. दोषी आढळल्यास सात वर्षांपर्यंतच्या कठोर कारावासाची शिक्षा आणि एक लाखापर्यंतच्या दंडाची तरतूद कायद्यात आहे.

जर एखाद्याला स्वेच्छेने धर्मांतर करायचे असेल तर त्या व्यक्तीला ६० दिवस (दोन महिने) आधी सक्षम प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करावा लागणार आहे. प्राधिकरणाकडून कायदेशीर पडताळणी आणि मंजुरी मिळाल्यानंतरच संबंधित व्यक्तीला धर्मांतर करता येईल. नव्या कायद्यातील तरतुदीनुसार आंतरधर्मीय विवाह झाल्यास दाम्पत्याच्या अपत्याला आईचा विवाहापूर्वीचा धर्म मिळणार आहे.

## कामोठे येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी वस्तूंचे वाटप

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून उपक्रमाचे कौतुक

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

नेत्याची खरी ताकद ही त्याच्या कार्यकर्त्यांमध्ये असते. या अनुषंगाने जयेंद्र जोशी आणि रवींद्र जोशी यांनी आयोजित केलेल्या सामाजिक उपक्रमामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह पक्षाची ताकद अधिक मजबूत झाली आहे, असे उद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे येथे आयोजित समाजोपयोगी वस्तूंच्या वाटप कार्यक्रमात काढले.



भारतीय जनता पक्षाचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देण्याऐवजी किंवा बॅनर लावण्याऐवजी विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत जयेंद्रशेठ जोशी युवा मंच आणि रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२) कामोठे सेक्टर ३६ येथील मसाला मंत्रा हॉल येथे समाजोपयोगी वस्तूंच्या वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत वस्तूंचे वाटप करून उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, नगरसेवक रवी जोशी, हॅप्पी सिंग, डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, प्रदीप भगत, नगरसेविका शीला भगत, हेमलता गोवारी, आयोजक जयेंद्र जोशी, राजेश गायकर, हर्षवर्धन पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत सामाजिक बांधिलकी जपत गरजू नागरिकांना मधुमेह तपासणी किट, ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन आधारासाठी वॉकिंग स्टीक तसेच शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. परिसरातील शेकडो नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे अनेक गरजू नागरिकांना व विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला.



खोपोली : मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे खंडाळा घाट व परिसरातील निसर्गाने हिरवा शालू परिधान केला आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमधून कोसळणारे पांढरेशुभ्र धबधबे, दाट धुक्याची चादर आणि सर्वदूर पसरलेली हिरवाई यामुळे संपूर्ण परिसर निसर्गप्रेमी व पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. (छाया : जयवंत माडपे)

## युवक तलावात बुडाला

**नालासोपारा : प्रतिनिधी**

तलावात मासे पकडण्यासाठी गेलेला १७ वर्षीय मुलगा पाण्यात बुडाल्याची घटना रविवारी (दि.२) दुपारी नालासोपारा पूर्वेतील गाला नगर-नारायण नगर परिसरातील नागेला तलावात घडली. सोहेल इब्राहिम असे बुडालेल्या तरुणाचे नाव असून अग्निशमन दल आणि बचाव पथकाकडून त्याचा युद्धपातळीवर शोध सुरू आहे.

सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील नद्या, तलाव आणि जलाशय तुडुंब भरले आहेत. त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून पोलिसांनी अशा धोकादायक ठिकाणी पोहण्यास व फिरण्यास बंदी घातली आहे, मात्र रविवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास सोहेल आपल्या मित्रांसोबत नागेला तलावात मासे पकडण्यासाठी गेला होता. मासे पकडत असताना अचानक पाण्याचा अंदाज न आल्याने तो खोल पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान आणि बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून सोहेलचा शोध घेण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली आहे, तर याप्रकरणी आचोळे पोलिसांकडूनही तपास सुरू आहे.

## देशातील अनेक राज्यांत पावसाचे थैमान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



देशाच्या अनेक भागांत सततच्या पावसाने पूरस्थिती निर्माण झाली आहे, तर काही ठिकाणी भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत. याचा सर्वाधिक फटका केरळमध्ये बसला असून तिथे मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे आठ जणांचा मृत्यू झाला आहे. इतर आठ जण बेपत्ता आहेत, तर १३ जण जखमी झाले आहेत.

केरळमध्ये पावसाच्या तडाख्यामुळे २७ घरे पूर्णपणे कोसळली आहेत, तर १९६ घरांचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाने अनेक जिल्ह्यांत प्रचंड नुकसान केले आहे. राज्यात २०९ रिलीफ कॅम्प उभारण्यात आले असून तेथे ५,७९२ लोकांना सुरक्षित ठेवण्यात आले आहे.

गुजरातच्याही अनेक जिल्ह्यांत जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. नवसारी, सुरत, भरूच, खेडा, डांग, भावनगर, नर्मदा, महीसागर या जिल्ह्यांमध्ये परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. रस्ते पाण्याखाली गेले आहेत. नडियाद शहरात वस्त्यांमध्ये चार-चार फुटांपर्यंत पाणी साचले आहे. दुकानांपासून ते गाड्यांपर्यंत सर्व काही पाण्याखाली गेले आहे.

हिमाचल प्रदेशमध्ये सततच्या पावसामुळे १०२ रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. याचा सर्वाधिक परिणाम मंडी, कुल्लू आणि शिमला येथे दिसून येत आहे. याशिवाय २८ पेयजल योजना आणि ११ वीज ट्रान्सफॉर्मरही प्रभावित झाले आहेत. राजस्थानच्या अनेक भागांत रविवारी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. दरम्यान, हवामान विभागाने अनेक राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

# चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री महागणपती नवसाला पावणारा देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. संकष्टी चतुर्थी आणि रविवारची सुट्टी एकत्र आल्याने हजारोंच्या संख्येने भाविक आणि पर्यटकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. पहाटेपासूनच मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले होते.

प्रथम श्री महागणपतीची महापूजा आणि महाआरती करण्यात आली. त्यानंतर दर्शनाला सुरुवात झाली. "गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया" च्या जयघोषात भक्तीमय वातावरणात भाविकांनी दर्शन घेतले. सध्या चिरनेर परिसरातील शेतकरी भात लावणीत व्यस्त असले तरी रविवारची सुट्टी आणि पावसाची बऱ्यापैकी उघडीप असल्यामुळे परगावातील गणेशभक्तांची मोठी गर्दी झाली होती. दर्शनाबरोबरच भाविकांनी निसर्गरम्य अक्कादेवी धरणातून वाहणाऱ्या धबधब्यांचाही आनंद घेतला. मंदिर परिसरात हार, नारळ, प्रसादाबरोबरच पावसाळी रानभाज्यांना मोठी मागणी होती.

हॉटेल व्यवसायिकांचा धंदाही तेजीत होता. श्री महागणपतीचे देवस्थान अत्यंत पुरातन आहे. पेशवेकालीन भव्य मंदिरात श्री महागणपती विराजमान आहेत. पद्मासनात बसलेल्या या मूर्तीची उंची सुमारे सहा फूट आणि रुंदी साडेतीन फूट आहे. शेंदूर चर्चित, चतुर्भुज आणि पूर्वाभिमुख असलेली ही मूर्ती तळ्यात सापडल्याची आख्यायिका आहे. रविवार आणि संकष्टी चतुर्थीचा योग जुळून आल्याने नवी मुंबईसह रायगडमधील हजारो गणेशभक्तांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी गर्दी केली होती. भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी चिरनेर गणपती देवस्थानच्या सर्व मुख्य पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी चोख व्यवस्था ठेवली होती.

# पनवेलमधील नऊ हजार ५३२ शिधापत्रिका रद्द

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या धान्य योजनेचा लाभ गरजूंपर्यंत पोहचवण्यासाठी मिशन सुधार अंतर्गत राज्यभर विशेष पडताळणी मोहीम राबवण्यात येत आहे. यात पनवेल तालुक्यातील नऊ हजार ५३२ अपात्र शिधापत्रिका धान्य योजनेतून वगळण्यात आल्या आहेत.

या मोहिमेदरम्यान अपात्र लाभार्थी, मृतांची नावे, स्थलांतरित कुटुंबे तसेच दुबार नोंदी शोधून त्यांची नावे योजनेतून वगळण्यात आली आहेत. पनवेल तालुक्यात अंत्योदय योजनेच्या ६७००पेक्षा अधिक शिधापत्रिका आहेत, तर प्राधान्य गटाच्या ६७ हजारांपेक्षा जास्त शिधापत्रिका आहेत. ग्रामीण भागात वार्षिक उत्पन्न ४४ हजार आणि शहरी भागात ५९ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्यास धान्य बंद होणार आहे. मिशन सुधार अंतर्गत काही लाभार्थी इतरत्र स्थलांतरित झाल्याचे तसेच काही प्रकरणांमध्ये पात्रतेचे निकष पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर अपात्र लाभार्थ्यांची नावे आणि शिधापत्रिका रद्द करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

## ती हत्या नव्हे, तर मृत्यू!

**नवीन पनवेल** : पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्द येथे अमित राय या तरुणाचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी मे महिन्यात अज्ञाताविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला होता, मात्र पोलीस तपासात ही हत्या नसून तो तरुण खाली पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अमित रायचा मृतदेह पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्दजवळील रेल्वे पुलाच्या कामाच्या ठिकाणी दोन पिलरच्या मधोमध आढळला होता. त्याचा डोळ्यांत भोसकल्याच्या खुणा दिसल्याने पनवेल शहर पोलिसांनी अज्ञाताविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला होता, मात्र पनवेल शहर पोलिसांनी तपास केला असता तरुणाची हत्या झाली नसून तो वरून खाली पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे.




## तरुणीला मारहाण

**नवीन पनवेल** : तरुणीला घरातील अतिरिक्त घरकाम लावून घराबाहेर पडण्यास अटकाव केला आणि मारहाण केली तसेच एकाने अश्लील शिवीगाळ करून स्पर्श केला. याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ वर्षीय तरुणी मूळची कोलकाता येथील असून ती गोरेगाव येथे राहते. १९ जुलै ते २८ जुलैदरम्यान खारघर येथील आरोपींनी फिर्यादी यांना अतिरिक्त घरकाम लावून घराबाहेर पडण्यास अटकाव केला आणि तिला हाताने आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली तसेच आरोपी जाफर शेख यांनी अश्लील शिवीगाळ करून वेळोवेळी स्पर्श करण्याचा प्रयत्न केला.

# सेंट विल्फ्रेड्स लॉ कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना अनुभवाधारित कायदे शिक्षण




**पनवेल : वार्ताहर**

सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभापासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक, सामाजिक आणि कायदेविषयक उपक्रमांना वेग आला आहे. अनुभवाधारित शिक्षणावर भर देत विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव, कायद्याचे व्यावहारिक ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी महाविद्यालयाकडून सातत्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.

व्यसनमुक्त भारत अभियान (नशामुक्त अभियान) अंतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रमात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शिल्पा प्रहार यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे वैज्ञानिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम सविस्तरपणे समजावून सांगितले. व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीत युवकांची भूमिका, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच भविष्यातील विधिज्ञ म्हणून जनजागृती, न्यायप्रक्रिया आणि पुनर्वसन क्षेत्रातील योगदानाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि कायदेविषयक प्रश्नांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय न्याय दिन आणि जागतिक लोकसंख्या दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरे करण्यात आले. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना समकालीन सामाजिक आणि कायदेशीर विषयांचा अभ्यास करण्याची संधी मिळाली.

संवादकौशल्य, संशोधन क्षमता, विश्लेषणात्मक विचारसरणी आणि प्रभावी सादरीकरण कौशल्य विकसित करण्यासाठी विविध कायदेविषयक विषयांवर विद्यार्थ्यांची शैक्षणिक सादरीकरणे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असून कायदेशीर संकल्पना प्रभावीपणे मांडण्याची क्षमता विकसित होत असल्याचे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले.

अनुभवाधारित कायदे शिक्षणाला अधिक बळकटी देण्यासाठी २३ जुलै रोजी विद्यार्थ्यांसाठी मुंबई उच्च न्यायालयाची शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी न्यायालयीन कामकाज प्रत्यक्ष पाहून न्यायव्यवस्थेची कार्यपद्धती आणि न्यायप्रक्रियेचा व्यावहारिक अनुभव घेतला.

या सर्व उपक्रमांद्वारे सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉ हे वर्गातील शिक्षण व प्रत्यक्ष न्यायव्यवस्थेतील अनुभव यांतील दरी कमी करण्यासाठी प्रयत्नशील असून सामाजिक भान असलेले सक्षम विधिज्ञ घडविण्याचे कार्य पार पाडत आहे.

महाविद्यालयाच्या उपक्रमांना विद्यार्थ्यांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थ्यांनी सांगितले की, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अवनी मिस्त्री तसेच सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. विविध वेबिनार, परिसंवाद, कार्यशाळा आणि शैक्षणिक उपक्रमांमुळे कायद्याचे व्यावहारिक ज्ञान मिळण्यास मदत होत असून संवादकौशल्य, संशोधन क्षमता आणि सादरीकरण कौशल्यातही लक्षणीय वाढ होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## ‘सीकेटी’त लोकमान्य टिळकांचे पुण्यस्मरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी इंग्रजी माध्यमिक विभागात शनिवारी (दि.१) लोकमान्य टिळक यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. प्रथमतः सीकेटी इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.



इंग्रजी माध्यमाच्या पर्यवेक्षिका निरजा अधुरी यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्मृतींना उजाळा देताना सांगितले की, आपल्या पूर्वजांनी जी वैचारिक मूल्ये आपणास दिली आहेत त्यांचा आपण आपल्या प्रगतीसाठी उपयोग करून घेतला पाहिजे. आपल्या स्वातंत्र्यसेनानींनी जे विचार आपल्यासमोर मांडले आहेत त्यांचा आपण व्यवस्थितरित्या उपयोग करावयास हवा.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणामध्ये लोकमान्य टिळकांना प्रणाम अर्पण केला. मनीषा नारखेडे यांनी आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडताना लोकमान्य टिळकांच्या विशिष्ट गुणांची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. लोकमान्य टिळकांच्या पुण्यस्मरणदिनी संस्थेचे शाळा निरीक्षक संतोष चव्हाण यांची उपस्थिती लाभली. त्यांनी लोकमान्य टिळकांच्या काही विशेष स्मृतींची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. कार्यक्रमास विषय शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पूर्वा खेडेकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

## स्मोक शॉपवर छापा

**पनवेल : वार्ताहर**

भारतात ई-सिगारेट उत्पादन, आयात-निर्यात, वाहतूक, साठवणूक आणि विक्रीवर संपूर्ण बंदी असतानाही खारघर सेक्टर-४ मधील द स्मोक शॉप या दुकानात उघडपणे ई-सिगारेटची विक्री सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खारघर पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी या दुकानावर छापा मारून तेथून हजारो रुपये किमतीचा प्रतिबंधित ई-सिगारेटचा साठा जप्त केला आहे.

खारघर सेक्टर-४ मधील भूमी टॉवर इमारतीतील शॉप नं. २० येथे असलेल्या द स्मोक शॉपमध्ये ई-सिगारेटची विक्री करण्यात येत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी येथे छापा मारला असता विविध फ्लेवर्स आणि ब्रँड्सचा ई-सिगारेटचा साठा आढळला. त्यावर पोलिसांनी हा ई-सिगारेटचा साठा जप्त करून दुकानचालक अहमद आदम साबीर (२२) याच्याविरोधात रीतसर गुन्हा दाखल केला आहे तसेच त्याला ताब्यात घेऊन कायदेशीर नोटीस बजावल्याचे पोलिसांनी सांगितले.



**पनवेल : टीआयपीएल कंपनीचे डायरेक्टर माताप्रसाद त्यागी यांना रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.**

## अण्णा भाऊ साठे जयंती, लोकमान्य टिळक स्मृतिदिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात १ ऑगस्ट रोजी अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्मृतिदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. लेखन प्रेरणा दिन म्हणून हा दिवस साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्यांनी यावेळी महापुरुषांच्या चरित्र ग्रंथांचे वाचन करून आपण त्यांचे विचार समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन केले. डॉ. ए. के. गायकवाड (भूगोल विभाग प्रमुख ) यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या चरित्रावर प्रकाश टाकताना फकीरा, वैजयंता या कादंबरीतील अन्यायाविरुद्धचा लढा विद्यार्थ्यांना सांगितला. तर डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाविषयी भाष्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा.अनुपमा कांबळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात डॉ. ए.आर. चव्हाण, डॉ. एच. के. जगताप, प्रा. विनिता तांडेल, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. दिपू यादव, प्रा. हन्नत शेख तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## उपनगराध्यक्ष विक्रम साबळे युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी



**पनवेल, खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीचे कार्यतत्पर उपनगराध्यक्ष विक्रम यशवंत साबळे यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी रविवारी (दि. २) अधिकृत घोषणा करण्यात आली. पनवेल येथील भाजप कार्यालयात पक्षाचे वरिष्ठ नेते आणि पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निवड सोहळा पार पडला.

खोपोली उपनगराध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यापासून साबळे यांनी पाणीपुरवठा खात्यात लोकहिताचे निर्णय घेतले. या कामाचे नागरिकांकडून स्वागत झाले. भाजप पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून त्यांच्या युवा संघटन कौशल्याची आणि उल्लेखनीय कार्याची विशेष दखल घेण्यात आली आहे.

पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला मी पूर्णपणे पात्र ठरण्याचा प्रयत्न करेन, असे उपनगराध्यक्ष साबळे यांनी सांगितले.

विक्रम साबळे यांच्या निवडीमुळे खोपोली शहरासह जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चिरनेरमध्ये चारसूत्री भात लागवडीचे प्रात्यक्षिक

**उरण : प्रतिनिधी**

पानी फाउंडेशनच्या चिरनेर येथील महागणपती शेतकरी गटाच्या वतीने चारसूत्री भात लागवडीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांच्या देखरेखीखाली १ ऑगस्ट रोजी चिरनेर येथील प्रफुल्ल काळूराम खारपाटील यांच्या शेतात कर्जत ५ या वाणाची चारसूत्री पद्धतीने लागवड करून दाखविण्यात आली.

यावेळी कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड आणि शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी शेतात उतरून शेतकऱ्यांसोबत चारसूत्री भात लागवड पद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. याप्रसंगी सुषमा गायकवाड यांनी चारसूत्री पद्धतीच्या भात लागवडीचे महत्त्व सांगितले. भात लावणीच्या रोपांमधील ओळीतील अंतर २५ सेंटीमीटर आणि रोपातील अंतर १५ सेंटीमीटर असावे, असे त्यांनी सांगितले. तसेच रोपांची मुळे इर्जीक करून जमिनीत युरियाचा वापर न करता जमिनीतील नत्राचे प्रमाण वाढविण्यासाठी गिरीपुष्पाच्या पाल्याचा वापर करण्याचे आवाहन केले.

डीएपी युरिया ब्रिकेट या खताचा वापर केल्याने खत हळूहळू विरघळून पिकांना पोषक ठरते, असेही त्यांनी सांगितले. रासायनिक खतांचा वापर टाळून जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी नैसर्गिक नत्र निर्मितीचे महत्त्व त्यांनी शेतकऱ्यांना पटवून दिले. तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी सांगितले की, चारसूत्री भात लागवड ही पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळी आहे. यात रोपे ठराविक अंतरावर दोरीच्या मापाने लावली जातात. त्यामुळे भात रोपांना पुरेसा सूर्यप्रकाश, हवा व अन्नद्रव्ये मिळतात आणि उत्पादनात वाढ होते. ही पद्धत पाणी व खतांच्या अपव्यय कमी करून उत्पादन खर्चात बचत करण्यास मदत करते. या प्रात्यक्षिकावेळी महागणपती शेतकरी गटाचे शेतकरी सदस्य उपस्थित होते.



## संपादकीय

# सायबर सावधगिरी आवश्यक

डिजिटल व्यवहारांनी जीवन अधिक वेगवान आणि सुलभ केले असले, तरी त्याच वेगाने सायबर गुन्ह्यांचे जाळेही विस्तारत आहे. एका क्लिकची चूक किंवा एका फोन कॉलवरचा विश्वास आयुष्यभराची कमाई गमावण्यास कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षेला आता केवळ तांत्रिक नव्हे, तर सामाजिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही महत्त्व प्राप्त झाले आहे.

**भारत आज जगातील सर्वात वेगाने डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करणाऱ्या देशांपैकी एक आहे. यूपीआय, नेट बँकिंग, मोबाइल वॉलेट, ऑनलाइन खरेदी, डिजिटल सरकारी सेवा यामुळे नागरिकांचे दैनंदिन व्यवहार अधिक सोपे झाले आहेत, मात्र ज्या वेगाने डिजिटल सुविधा वाढत आहेत, त्याच वेगाने सायबर गुन्हेगारांची फसवणुकीची साधने आणि पद्धतीही बदलत आहेत. त्यामुळे डिजिटल क्रांतीसोबत डिजिटल सुरक्षिततेचा विचार अपरिहार्य ठरला आहे. अलीकडच्या काळात 'डिजिटल अटक' या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीने देशभर चिंता निर्माण केली आहे. स्वतःला सीबीआय, ईडी, पोलिस किंवा अन्य सरकारी यंत्रणांचे अधिकारी असल्याचे सांगून व्हिडीओ कॉलद्वारे नागरिकांना धमकावले जाते. बनावट कागदपत्रे दाखवून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळले जातात. याशिवाय केवायसी अपडेट, वीज बिल, पार्सल अडकल्याचा संदेश, नोकरीचे आमिष, गुंतवणुकीवर अवास्तव परतावा, बनावट कर्ज ॲप्स, तसेच सोशल मीडियावरील बनावट प्रोफाइलद्वारे होणारी फसवणूक सातत्याने वाढत आहे. विशेष म्हणजे, या गुन्ह्यांचे बळी केवळ ज्येष्ठ नागरिक किंवा तंत्रज्ञानाची कमी माहिती असलेले लोकच नाहीत. डॉक्टर, अभियंते, उद्योजक, सरकारी अधिकारी आणि विद्यार्थीही या जाळ्यात अडकत आहेत, कारण सायबर गुन्हेगार आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डीपफेक तंत्रज्ञान, बनावट वेबसाइट्स आणि विश्वासार्ह वाटणारे संदेश यांचा वापर करून फसवणूक अधिक प्रभावी बनवत आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार, भारतीय रिझर्व्ह बँक, विविध बँका आणि राज्य पोलिसांनी जनजागृती वाढविण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन १९३०, सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल, तसेच वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना नागरिकांसाठी महत्त्वाच्या ठरत आहेत. तरीही केवळ सरकारी यंत्रणांच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने डिजिटल व्यवहार करताना आवश्यक दक्षता बाळगणे ही काळाची गरज आहे. सायबर सुरक्षेचा पाया म्हणजे जागरूकता. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, ओटीपी, यूपीआय पिन, सीव्हीव्ही क्रमांक किंवा बँक खात्याची माहिती कोणालाही न देणे, संशयास्पद ॲप्स डाउनलोड न करणे, अधिकृत वेबसाइटचाच वापर करणे आणि प्रत्येक खात्यासाठी वेगळा व मजबूत पासवर्ड ठेवणे या साध्या सवयी मोठ्या आर्थिक नुकसानीपासून वाचवू शकतात. त्याचप्रमाणे सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती अनावश्यकपणे शेअर करणेही टाळले पाहिजे. शाळा, महाविद्यालये, उद्योगसंस्था आणि सरकारी कार्यालयांमध्ये सायबर सुरक्षा प्रशिक्षण अनिवार्य करण्याची गरज आहे. जशी वाहतूक नियमांची माहिती दिली जाते, तशीच डिजिटल सुरक्षेची प्राथमिक माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचली पाहिजे. डिजिटल व्यवहार ही आजची अपरिहार्यता आहे, मात्र त्याचबरोबर डिजिटल जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. तंत्रज्ञान हे विकासाचे प्रभावी साधन आहे, परंतु त्याचा सुरक्षित वापर करण्याची सवय लागली तरच त्याचे खरे लाभ समाजाला मिळतील. अन्यथा डिजिटल सुविधा जितक्या वेगाने वाढतील, तितक्याच वेगाने सायबर गुन्ह्यांचे संकटही गडद होत जाईल. म्हणूनच 'सावध नागरिक, सुरक्षित डिजिटल भारत' हा मंत्र प्रत्येकाने आचरणात आणण्याची वेळ आता आली आहे.**

# सुरक्षित, सन्मानित आणि उज्ज्वल बालपणासाठी...

सुरक्षित, सन्मानित आणि आनंदी बालपण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे. राज्य बाल हक्क संरक्षण आयोग हा केवळ तक्रार निवारण करणारा संस्थात्मक मंच नसून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. शासन, पालक, शिक्षक, पोलीस, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी समन्वयाने कार्य केल्यास बालकांवरील अत्याचार, शोषण आणि भेदभाव रोखणे शक्य होईल. प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरण, समान संधी आणि उज्ज्वल भविष्य मिळावे, हीच आयोगाची आणि संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

**बालकांच्या संरक्षणासाठी राज्याची बांधिलकी**

बालक हे देशाचे भविष्य असून त्यांच्या सुरक्षित, सन्मानित आणि सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही शासन आणि समाजाची संयुक्त जबाबदारी आहे. बालकांवरील अत्याचार, शोषण, भेदभाव, बालमजुरी, बालविवाह, लैंगिक अत्याचार, ऑनलाईन छळ, शिक्षणापासून वंचित राहणे किंवा मानसिक त्रास अशा कोणत्याही परिस्थितीत त्यांना तातडीने संरक्षण आणि न्याय मिळावा, यासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोग कार्यरत आहे. बालकांच्या संविधानिक आणि कायदेशीर हक्कांचे रक्षण करणे, त्यांच्या तक्रारींची दखल घेणे आणि संबंधित यंत्रणांमार्फत प्रभावी कार्यवाही सुनिश्चित करणे हे आयोगाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**बालकांना मिळणारे मूलभूत हक्क**

प्रत्येक बालकाला जन्मापासून जीवन, संरक्षण, शिक्षण, आरोग्य, पोषण, विकास आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. जात, धर्म, लिंग, भाषा, सामाजिक किंवा आर्थिक स्थिती, अपंगत्व किंवा इतर कोणत्याही कारणावरून बालकांशी भेदभाव करता येत नाही. प्रत्येक बालकाला दर्जेदार आरोग्यसेवा, शिक्षण, सामाजिक सुरक्षा, खेळ, विश्रांती, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचा तसेच व्यक्तिमत्त्व, बुद्धिमत्ता आणि शारीरिक क्षमतांचा सर्वांगीण विकास करण्याचा अधिकार आहे.

याशिवाय कोणत्याही बालकाचे अपहरण, तस्करी, विक्री, आर्थिक किंवा लैंगिक शोषण, बालमजुरी किंवा अंमली पदार्थांच्या गैरवापरात सहभागी होणे रोखणे ही राज्य आणि समाजाची जबाबदारी आहे. कौटुंबिक वातावरणापासून वंचित असलेल्या तसेच मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या दिव्यांग बालकांना विशेष संरक्षण, सन्मानपूर्वक जीवन आणि समाजात सक्रिय सहभागाची संधी मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे.

**आयोगाची कार्यक्षेत्रे आणि जबाबदाऱ्या**

राज्य बाल हक्क संरक्षण आयोग बालकांच्या हितासाठी विविध स्तरांवर काम करतो. बालकांवरील अत्याचार, शोषण, दुर्लक्ष आणि भेदभावासंदर्भातील तक्रारींची चौकशी करून त्यावर आवश्यक कार्यवाही केली जाते. बाल संरक्षणासंबंधीचे कायदे, धोरणे आणि शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही यावर आयोग देखरेख ठेवतो.




बालगृहे, निरीक्षण गृहे, विशेष गृहे आणि इतर बालसंस्थांची नियमित पाहणी करून तेथील सुविधा आणि बालकांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित केले जाते. तसेच बाल संरक्षण, शिक्षण, आरोग्य व पोषण, बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, पोक्सो कायद्याची अंमलबजावणी, बालतस्करी प्रतिबंध आणि बालहक्कांविषयी जनजागृती यांसारख्या विषयांवर आयोग सातत्याने काम करतो.

**संकटात सापडलेल्या बालकांसाठी मदतीचा आधार**

घरातून पळून गेलेली किंवा हरवलेली मुले, रस्त्यावर राहणारी मुले, बालमजूर, घरगुती काम करणारी मुले, लैंगिक किंवा शारीरिक अत्याचाराला बळी पडलेली मुले, तस्करीची शिकार झालेली मुले, भावनिक आधाराची गरज असलेली मुले तसेच पालकांनी सोडून दिलेली मुले अशा संकटग्रस्त बालकांच्या संरक्षणासाठी आयोग विविध यंत्रणांच्या माध्यमातून कार्यरत आहे.

कोणत्याही बालकासोबत शोषणाची घटना घडल्यास संबंधित पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक किंवा बाल कल्याण पोलीस अधिकाऱ्याशी तातडीने संपर्क साधता येतो. प्रत्येक जिल्ह्यात बाल न्याय व्यवस्था उपलब्ध असून बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाते.

**बाल न्याय मंडळाची भूमिका**

कायद्याच्या विरोधात आढळलेल्या किंवा गुन्ह्यात आरोपित असलेल्या मुलांनाही सन्मानपूर्वक आणि न्याय्य वागणूक मिळणे हा त्यांचा कायदेशीर अधिकार आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेले बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) संबंधित प्रकरणांवर सुनावणी करून पुनर्वसन आणि न्याय या दोन्ही बाबींना प्राधान्य देते.

**बालस्नेही समाज निर्माण करण्यासाठी उपक्रम**

बालकांच्या संरक्षणासाठी केवळ शासन नव्हे तर समाजाचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. या उद्देशाने राज्यात मंत्री आदिती तटकरे यांनी नुकतेच बालविवाह, बाल संरक्षण आणि शिक्षण यावर भर देणारी बालस्नेही पंचायत राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. बालकांपर्यंत त्यांचे हक्क आणि अधिकारी या बालस्नेही पंचायतच्या माध्यमातून पोहोचणार आहेत. हा उपक्रम राबविण्यासाठी युनिसेफ आणि यशदा यांच्या सहकार्याने विविध गावांमध्ये बालस्नेही वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

बालकांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी मन मुक्त फाऊंडेशनच्या सहकार्याने दहा जिल्ह्यांमध्ये विशेष प्रकल्प राबविण्यात येत आहेत. पालघर जिल्ह्यात शाळांमध्ये मॅजिक बॉक्स थिंकिंग कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्जनशील आणि सकारात्मक विचारक्षमतेचा विकास केला जात आहे.

**प्रशिक्षण, जनजागृती आणि सायबर सुरक्षा**

बाल सुरक्षा अभियानांतर्गत शिक्षक, पोलीस अधिकारी, महिला व बालविकास विभागातील अधिकारी तसेच विविध संस्थांच्या प्रतिनिधींसाठी राज्यभर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. बालकांच्या ऑनलाईन सुरक्षिततेसाठी सायबर सुरक्षा आणि डिजिटल जबाबदारीविषयी मार्गदर्शन सत्रेही आयोजित केली जात आहेत.

होप फाउंडेशनच्या सहकार्याने पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बालस्नेही कार्यपद्धतीचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच पोक्सो कायद्यानुसार नियुक्त सहायक व्यक्तींसाठी नियमित प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजनही आयोगामार्फत केले जाते.

**भविष्यातील महत्त्वपूर्ण उपक्रम**

बाल संरक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी आयोगाने अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम प्रस्तावित केले आहेत. चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्रात बालकलाकारांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येणार आहे. गावांच्या पुरस्कार निकषांमध्ये बालसुरक्षेचा समावेश करण्याचा प्रस्ताव आहे. तृतीयपंथीय बालकांसाठी स्वतंत्र धोरण, लहान मुलांच्या ऑनलाईन वापराबाबत मार्गदर्शक तत्त्वे आणि लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये सर्व विभागांसाठी एकसमान कार्यपद्धती (SOP) विकसित करण्याचे नियोजन आहे.

याशिवाय ग्रामस्तरावर बालपंचायतींचे बळकटीकरण, बाल सुरक्षा पथके, बालमजुरीविरोधी विशेष मोहीम, बालविवाह प्रतिबंधासाठी व्यापक जनजागृती तसेच एनएसएस स्वयंसेवक, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून चाईल्ड हेल्प ग्रुप स्थापन करण्याची योजना आहे.

**चाईल्ड हेल्पलाईन : तातडीच्या मदतीसाठी विश्वासार्ह सेवा**

कोणतेही बालक संकटात असल्यास किंवा बालहक्कांचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ आणि आपत्कालीन सेवा ११२ या २४ तास, वर्षभर मोफत उपलब्ध असलेल्या सेवांवर संपर्क साधता येतो. या माध्यमातून बालकांना तातडीची मदत, संरक्षण, समुपदेशन आणि आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही उपलब्ध करून दिली जाते.

**–श्रद्धा मेश्राम,**
विभागीय संपर्क अधिकारी



## बदलते तंत्रज्ञान

# रोजच्या वापरासाठी नक्की किती इंटरनेट स्पीड हवा?

आजच्या काळात इंटरनेटशिवाय आपले पानही हलत नाही. उत्तम इंटरनेट गतीसाठी अनेकजण दरमहा हजारो रुपये खर्च करतात, पण खरोखरच प्रत्येक घराला हाय–स्पीड इंटरनेटची गरज असते का? वापराच्या स्वरूपानुसार नेमका किती इंटरनेट स्पीड पुरेसा ठरू शकतो हे समजून घेऊया.




नेमकी काय असतो इंटरनेट स्पीड?

इंटरनेट स्पीड हा 'बिट्स प्रति सेकंद'मध्ये मोजला जातो. म्हणजेच एका सेकंदात किती बिट्स एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ट्रान्सफर होतात. इंटरनेटच्या सुरुवातीला ही गती 'किलोबिट्स प्रति सेकंद'मध्ये मोजली जायची. १९९०च्या दशकात इंटरनेटची सरासरी स्पीड केवळ १४.४ Kbps आणि कमाल स्पीड ५६ केबीपीस इतका होता. आज मात्र परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. ग्लोबल स्तरावर फिक्स ब्रॉडबँडचा सरासरी स्पीड सुमारे १२० एमबीपीस आणि मोबाईल डेटाचा स्पीड १०९ एमबीपीसपेक्षा जास्त झाला आहे.

डाउनलोड आणि अपलोड स्पीडमधील फरक समजून घ्या

बहुतेक इंटरनेट प्लॅन हे केवळ डाउनलोड स्पीडवर लक्ष केंद्रित करतात, परंतु अपलोड स्पीडदेखील तितकाच महत्त्वाचा असतो. सर्वरवरून तुमच्या डिव्हाइसपर्यंत माहिती पोहचण्यास लागणारा वेळ म्हणजे डाउनलोड स्पीड, तर तुमच्या डिव्हाइसवरून डेटा इंटरनेटवर पाठवण्याचा वेग म्हणजे अपलोड स्पीड. हा वेग सहसा डाउनलोड स्पीडपेक्षा थोडा कमी असतो.

कोणत्या कामासाठी किती स्पीड लागते?

घरातील इंटरनेटचा वापर कसा आहे यावर स्पीड किती असावा हे ठरते. वेब ब्राउझिंगसाठी ३ ते ५ एमबीपीस स्पीड गरजेचं असतो, तर ई–मेल आणि चॅटिंगसाठी १ एमबीपीस, व्हिडिओ स्ट्रीमिंगसाथी २० ते ५० एमबीपीस, व्हिडीओ कॉन्फरन्सिंगसाठी ३ एमबीपीस, ऑनलाइन गेमिंगसाठी २५ ते १०० एमबीपीस, स्मार्ट होम डिव्हाइसेसमध्ये १० ते १२ उपकरणांसाठी अतिरिक्त ५ ते १० अपलोड स्पीड गरजेचा असतो.

भारतातील मोबाईल डेटा वापर जगात अव्वल

एका अहवालानुसार भारतामध्ये मोबाईल डेटाचा वापर जगभरात सर्वाधिक आहे. भारतातील एक स्मार्टफोन वापरकर्ता दरमहा सरासरी ३७ GB डेटा वापरतो आणि २०२३पर्यंत हा आकडा ७० GBपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. डिजिटल सेवांचा वाढता वापर आणि स्वस्त डेटा यामुळे भारतात डेटा क्रांती पाहायला मिळत आहे.

# विख्यात गणिती वेंकटेश केतकर

वेंकटेश बापूजी केतकर (जन्म : १८ जानेवारी इ.स.१८५४–मृत्यू ३ ऑगस्ट इ.स. १९३०) हे भारतातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्योतिषाचार्य होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



## निमित्त

वेंकटेश यांच्या वडिलांचे नाव रामकृष्ण ऊर्फ बापूशास्त्री केतकर असे होते. त स्वतः ज्योतिःशास्त्रज्ञ होते, मात्र त्यांनी ज्योतिर्विज्ञानाचा अभ्यास कोणापाशी केला यांची नोंद नाही. त्या काळातील आणि त्या अगोदरच्या काळातील पाश्चात्त्य पंडितांनी गणिताच्या आणि ज्योतिर्गणिताच्या नवनवीन शाखा शोधून त्यांत नवे शोध लावल्यामुळे या शास्त्राचा अधिक विकास झाला होता. अर्थातच त्यामुळे ग्रंथलाघवासारख्या भारतीय ग्रंथांवरून आलेल्या ग्रह–ताऱ्यांच्या भ्रमण, ग्रहण आदी गोष्टींच्या वळांचा पाश्चात्त्याच्या ग्रंथांनुसार येणाऱ्या वेळांशी मेळ बसत नसे. हे पाहून बापूशास्त्री केतकर यांनी ज्योतिःशास्त्रसुबोधिनी नावाच्या एका नव्या ग्रंथाची रचना केली.


इ.स. १८६०मध्ये प्रा. केरूनाना छत्रे यांनी ग्रहसाधना नावाचा ज्योतिर्गणितासंबंधीचा एक उत्तम ग्रंथ मराठीत रचला. संशोधनाच्या कार्यात ह्या ग्रंथांची उपयुक्तता जाणून रामदुर्गकर संस्थानिकांच्या विनंतीवरून बापूशास्त्री यांनी त्याचे संस्कृत भाषेत रूपांतर केले होते. बापूशास्त्री इ.स. १८४१पर्यंत पैठण येथे होते. त्यानंतर ते रुद्रवीणा या वाद्यात पारंगतता मिळविण्यासाठी तंजावरला निघाले, पण नरगुंदपर्यंत पोहोचल्यावर तेथे त्यांना रुद्रवीणानिष्णात रा. वेंकाबुवा म्हैसकरांसारखे गुरू लाभल्याने तेथेच त्यांनी वास्तव्य केले. नरगुंद येथेच पौष शुद्ध चतुर्दशी शके १७७५ (१८जानेवारी इ.स.१८५४) रोजी वेंकटेश यांचा जन्म झाला.

इ.स. १८७० साली वेंकटेश हे बेळगावातील सरदार हायस्कूल येथे इंग्रजी शिक्षण घेत होते. त्या सुमारास त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर दारिद्र्याशी झगडत वेंकटेश यांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. इ.स. १८७४ साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होणाऱ्यांत त्यांचा तिसरा क्रमांक होता. त्यांना बाई माणिकबाई बैरामजी जीजीभाय पारितोषिक मिळाले. गरिबीमुळे त्यांना त्या पुढील उच्च शिक्षण घेता आले नाही.

इ.स.१८७५ साली वेंकटेश शाळा खात्यात नोकरीला लागले. इ.स.१९११ साली ते ३६ वर्षांची सरकारी नोकरी बजावून फर्स्ट असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर या पदावरून निवृत्त झाले.

इ.स.१८६८ साली झालेल्या खग्रास सूर्यग्रहणाच्या काळात पहावयास मिळालेल्या नैसर्गिक गमतीमुळे तो प्रसंग वेंकटेश यांच्या मनावर बिंबला गेला. त्यातूनच त्यांच्या मनावर ज्योतिषशास्त्राध्ययनाचे महत्त्व पटले. सुरुवातीला त्यांनी ज्योतिःशास्त्रविषयक अभ्यास त्यांचे वडील बापूशास्त्री यांनी रचलेल्या ग्रंथांवरूनच सुरू केला, मात्र सूर्यसिद्धान्तादी प्राचीन व अर्वाचिन ज्योतिषग्रंथांचे आकलन त्यांना वडील बंधू बाळशास्त्री केतकर यांच्याकडून झाले. बाळशास्त्री केतकर हे स्वतः ज्योतिषशास्त्र शिकण्याकरिता पुण्यात केरूनाना छत्रे यांच्याकडे एक वर्षभर होते. बाळशास्त्र्यांकडून मिळालेले हे ज्ञान वेंकटेश यांनी स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आणखी वाढविले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# डेंग्यूतून बरे होताना शरीर होते कमजोर, चिंता नको!

पावसाळ्यात डासांपासून उपद्रव वाढत असल्याने मलेरिया, डेंग्यू किंवा डेंगी (चिकनगुनिया) आणि इतर डासांपासूनच्या आजारांचे प्रमाण वाढत असते. या डेंग्यूच्या तापाला चिकनगुनिया देखील म्हटले जाते. यात शरीर तापाने अक्षरश: वाकत असते. त्यामुळे या आजाराला हाडमोड्या ताप देखील म्हटले जाते इतके आपले सांधे आणि डोके दुखत असते. डासाच्या एडीस इजिप्ती या प्रजातीच्या डासांच्या माध्यमातून विषाणूजन्य ताप येत असतो. या आजारावर लोपथीच बेस्ट असते, परंतु आपण आजारातून बरे होताना ॲलोपथीची औषधे सुरू ठेवून आपला आहार विहार बदलल्यास कमजोरीतून लवकर बाहेर पडतो.



**किवी, ड्रायगन फूड, लिंबूवर्गीय फळे खावीत :** डेंग्यूचा ताप उतरल्यानंतर शरीराची इम्युनिटी पॉवर वाढविण्यासाठी किवी, ड्रॅगन फूड किंवा संत्र्यासारखी लिंबूवर्गीय आंबड फळे खावीत.यात विटामिन सी, एंटी–ऑक्सिडेंट आणि मिनरल्स भरपूर असतात. त्यामुळे शरीर अगदम तंदुरुस्त होऊन तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यासाठी मदत होते.

**दूधाचा वापर :** डेंग्यूतून जर लवकर बरे व्हायचे असेल आणि तुम्हाला दूध पचत असेल तर रोज गरम दूध प्यायल्यानेदेखील फायदा होतो. दूधात अनेक पोषक तत्वं असतात. ज्यामुळे शरीर हेल्दी बनते आणि उत्साह वाढतो.

**लिक्विड डाएटचा वापर :** डेंग्यू तापातून रिकव्हर झाल्यानंतर तुम्ही शरीरातील कमजोरी घालविण्यासाठी पातळ अन्नपदार्थांना खाऊ शकता. पाणी आणि् फ्रूट ज्यूस भरपूर प्यावा अर्थात घरच्या घरी ज्यूस गेलेला बरा. डाएटमध्ये ग्लूकोजचे पाणी प्यावे,नारळ पाणी, लिंबू पाणी, सरबत पिणे फायदेशीर असते, परंतु स्वच्छता असलेल्या ठिकाणचे सरबत प्यावे.

**हिरव्या पालेभाज्या खाव्यात :** आपल्या आहारात मोसमी पालेभाज्यांचा अधिक वापर असावा. भाज्याचे सूपदेखील करून प्यायल्यास फायदा होईल. जास्त तळलेले तेलकट आणि मसालेदार आणि तिखट काही खाऊ नये. कॅफीन आणि हाय कोलेस्ट्रॉल असणारे पदार्थ उदा. चहा आणि कॉफी तसेच मद्यपान आणि सिगारेट यापासून चार हात लांब राहावे.

**अंडी खावीत :** डेंग्यूच काय तर कोणत्याही आजारात जर पटकण आपल्याला कमजोरी घालवायची असेल तर प्रोटीन गरजेचे असते. अंड्यात खूप मोठ्या प्रमाणात प्रोटीन, कॅल्शियम, विटॅमिन–बी, पोटॅशियम असते. ज्यामुळे डेंग्यूनंतर शरीर मजबूत होण्यासाठी मदत होते.

# रोहा रेल्वेस्थानकाचा होणार कायापालट

## खासदार सुनील तटकरे यांच्याकडून पाहणी




**रोहा : प्रतिनिधी**
मध्य रेल्वेवरील शेवटचे स्थानक असलेले रोहा रेल्वे स्थानक आता आंतरराष्ट्रीय विमानतळासारखे अद्यावत होणार आहे. या स्थानकाच्या विकासकामांची खासदार सुनील तटकरे यांनी रविवारी (दि. २) रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष समीर सकपाळ, राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष समीर शेडगे, सभापती महेश कोलाटकर, निता हजारे, राजेंद्र जैन, नगरसेवक अजित मोरे, माजी नगरसेवक सुभाष राजे यांच्यासह रोहा नगरपरिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक, रेल्वेचे अधिकारी आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, मध्य रेल्वेवरील पनवेलनंतर पेण आणि रोहा ही महत्त्वाची रेल्वे स्थानके आहेत. रोहा रेल्वे स्थानकाचा परिसर पूर्णपणे अद्यावत करण्यात येणार आहे. याच धर्तीवर पेणचे रेल्वे स्थानकही विकसित होणार असून, तेथे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या गणपतीपुळे मूर्तीच्या संकल्पनेवर आधारित सुशोभीकरण केले जाईल. यासाठी संबंधितांना संकल्पना तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२५ कोटी रुपये खर्चून होणाऱ्या या अद्यावतीकरणात स्वतंत्र रिक्षा पार्किंग, टू व्हीलर पार्किंग, फोर व्हीलर पार्किंग, रोहा रेल्वे स्थानकाचे सुशोभीकरण, प्लॅटफॉर्म सुशोभीकरण आणि उद्यानाचा समावेश आहे. संपूर्ण रेल्वे स्थानक परिसराचा कायापालट केला जाणार आहे. लवकरच दोन्ही रेल्वे स्थानकांची निविदा प्रक्रियापूर्ण करून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात कामाला सुरुवात होणार आहे.

यावेळी खासदार सुनील तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे यांना प्रस्तावित रेल्वे स्थानकाचे छायाचित्र दाखविण्यात आले. तसेच रोहा, पेण रेल्वेसंदर्भातील समस्या प्रवासी संघटनेच्या वतीने खासदार सुनील तटकरे यांच्याकडे मांडण्यात आल्या. यासंदर्भात लवकरच रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार असल्याचे खासदार तटकरे यांनी सांगितले.

## रेवदंडा पंचक्रोशीत मच्छीचे भाव गगनाला!

**रेवदंडा : प्रतिनिधी**
कोकण किनारपट्टीवरील पर्यटन हंगामाला वेग आल्याने रेवदंडा पंचक्रोशीतील मच्छी मार्केटमध्ये ताज्या माशांच्या किमती अक्षरशः गगनाला भिडल्या आहेत. पर्यटकांकडून वाढलेली मागणी, मर्यादित आवक आणि व्यापाऱ्यांची वाढती खरेदी यामुळे पापलेट, सुरमई, रावस, कोळंबी यांसह अनेक प्रकारच्या माशांच्या दरात मोठी वाढ झाली आहे.

रेवदंडा परिसर हा रायगडमधील महत्त्वाचा मासेमारी विभाग असून येथून मोठ्या प्रमाणावर ताजी मासळी विविध शहरांमध्ये पाठविली जाते. पर्यटनामुळे स्थानिक बाजारपेठेला आर्थिक चालना मिळत असली तरी सर्वसामान्य कुटुंबांना मात्र रोजच्या जेवणातील मासे परवडेनासे झाले आहेत. पूर्वी सहज उपलब्ध होणारी मासळी आता वाढीव दरांमुळे अनेकांच्या आवाक्याबाहेर गेल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत. मच्छी विक्रेत्यांच्या मते शनिवार-रविवार तसेच सुट्ट्यांच्या दिवशी पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे सकाळीच चांगल्या प्रतीची मासळी विकली जाते आणि उरलेली मासळीही वाढीव दराने विकावी लागते. परिणामी स्थानिक ग्राहकांना जास्त पैसे मोजावे लागत आहेत.

स्थानिक नागरिकांनी पर्यटनासोबतच स्थानिक ग्राहकांचाही विचार करून दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी लक्ष देण्याची मागणी केली आहे. अन्यथा कोकणातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आनंद स्थानिकांनाच घेणे कठीण होईल, अशी चिंता नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# भातशेती झाली परवडेनाशी; मजुरी, मशागत, अन्य खर्च वाढल्याने शेतकरी चिंतातुर

**खोपोली : प्रतिनिधी**
रायगड जिल्ह्यासह खालापूर तालुक्यात यंदा उशिरा झालेल्या पावसामुळे भात लागवड उशिरा झाली. अद्याप अनेक ठिकाणी भात लागवड सुरू आहे, तर मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी जुलै महिन्यात भात लागवड केल्याने ग्रामीण भागातील भातपिके बहरत असून शेतशिवार हिरवाईने नटले आहे. पावसाची स्थिती समाधानकारक असली तरी वाढती मजुरी, मशागतीचा खर्च, खते, औषधे आणि इतर सर्वच खर्चाबाबत दरवाढीमुळे भातशेती आर्थिकदृष्ट्या परवडेनाशी झाल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर होणारा वाढीव खर्च शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. जमीन नांगरणी, ट्रॅक्टर, रोपलागवड, बेणणी, खते, कीडनियंत्रण, कापणी आणि झोडपणीपर्यंत सर्वच कामांचे दर वाढले आहेत. शेतमजुरांची टंचाई असल्याने उपलब्ध मजुरांना अधिक मजुरी द्यावी लागत आहे. त्याचबरोबर मजुरांच्या चहा, नाश्ता व जेवणाचाही खर्च शेतकऱ्यांनाच करावा लागतो. भाताला बाजारात मिळणारा दर आणि उत्पादनासाठी होणारा खर्च यामध्ये मोठी तफावत असल्याने शेतीतून अपेक्षित आर्थिक उत्पन्न मिळत नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करीत आहेत. हवामानातील अनिश्चितता आणि अवकाळी पावसाचा धोका कायम असल्याने शेवटच्या टप्प्यात पिकांचे नुकसान होण्याची भीतीही शेतकऱ्यांना सतावत असते.

ग्रामीण भागात पूर्वी "अरदल" पद्धतीने जमीनमालक आणि शेतकरी समान वाट्याने उत्पन्न वाटून घेत असत. मात्र, बदलत्या परिस्थितीत ही पद्धतही बदलली असून अनेक ठिकाणी शेती ओसाड पडत आहे. काही जमीनमालकांनी शेती करणेच बंद केले असून अनेक ठिकाणी शेती विक्रीकडेही कल वाढल्याचे चित्र दिसत आहे. एकूणच भातशेती आज आर्थिकदृष्ट्या फायदेशीर न राहता परंपरा आणि संस्कृती जपण्याचे माध्यम बनत चालल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.



## महाडला आधुनिक 'अपेक्स टर्फ'ची नवी ओळख

**महाड : प्रतिनिधी**
महाडमधील क्रीडाप्रेमींसाठी आधुनिक आणि सुरक्षित क्रीडा सुविधेचे नवे पर्व सुरू झाले असून, महाड शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत नातेखिंड-करंजखोल येथील सर्व्हिस रोडवर उभारण्यात आलेल्या 'अपेक्स टर्फ' या अत्याधुनिक इनडोअर क्रीडा संकुलाचे उद्‍घाटन रविवारी (दि. २) सकाळी राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात झाले.

महाडमधील उद्योजक चेतन उतेकर तसेच त्यांचे सहकारी अजिंक्य सुतार, केदार कवे व विनायक इनामदार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रकल्पामुळे महाडमध्ये प्रथमच अशा स्वरूपाची जाळीदार बंदिस्त कृत्रिम गवतावरील आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध झाली आहे. या मैदानावर फुटबॉल, टेनिस बॉल क्रिकेटसह विविध मैदानी खेळ वर्षभर सुरक्षित वातावरणात खेळता येणार आहेत.



मुंबई, पुण्यासारख्या महानगरांमध्ये अशा सुविधा सर्वसामान्य असल्या तरी महाडमध्ये त्यांचा अभाव जाणवत होता. पावसाळ्यात मैदानांची दुरवस्था, वाढते शहरीकरण आणि खेळण्यासाठी मोकळ्या जागांचा तुटवडा लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. नाममात्र शुल्कात खेळाडूंना ठराविक वेळेसाठी मैदान उपलब्ध करून देण्यात येणार असून युवक, महिला व बालकांनी सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

उद्‍घाटनानिमित्त महिलांच्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत आठ महिला संघांनी सहभाग घेतला. एकेकाळी बोटावर मोजण्याइतके महिला क्रिकेट संघ असलेल्या महाडमध्ये आज मोठ्या संख्येने महिला क्रिकेटमध्ये पुढे येत असल्याचे चित्र स्पर्धेत पाहायला मिळाले.

मंत्री भरत गोगावले यांनी उद्योजक चेतन उतेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करत महाडकरांसाठी आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कौतुक करीत अशा उपक्रमांसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही दिली. लाडवली येथील क्रीडा संकुल दुरवस्थेबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, त्या संकुलासाठी पूर्वी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता; मात्र त्याचा अपेक्षित दर्जाचा वापर झाला नाही, याची खंत आहे. सध्या एमआयडीसीच्या माध्यमातून काळीज, महाड परिसरात आणखी आधुनिक क्रीडा सुविधा उभारण्याचा प्रयत्न केला जाईल.

## मोरे माऊली सेवा समितीतर्फे पोलादपूरमध्ये कोकण विभागाचा गुरुपौर्णिमा महोत्सव

**पोलादपूर : प्रतिनिधी**
जसा शिष्याला गुरु प्रिय असतो, तसाच गुरुही शिष्यावर प्रेम करतो. गुरुला जात, धर्म अथवा वयाचे कोणतेही बंधन नसते. समाजाला योग्य दिशा देणे, संत महात्म्यांचे विचार जनमानसापर्यंत पोहोचविणे आणि आदर्श शिष्य घडविणे हेच गुरुचे खरे कार्य आहे, असे स्पष्ट मार्गदर्शन सद्‍गुरू आनंददादा महाराज मोरे माऊली यांनी केले.

सदगुरु मोरे माऊली महाराज सेवा समिती, कोकण विभाग यांच्या वतीने गुरुपौर्णिमा महोत्सव २०२६ चे आयोजन कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहात करण्यात आले होते. यावेळी सदगुरु श्री दादा महाराज मोरे माऊली यांनी आपल्या उपदेशपर वाणीने भक्त मंडळींना अंतर्मुख केले. या गुरुपौर्णिमा महोत्सवात कोकण विभागासह विविध भागांतील हजारो साधक, वारकरी आणि मान्यवर मोठ्या



संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी गुरुवर्य ह.भ.प. वैकुंठनिवासी ज्ञानेश्वर मोरे माऊली यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. पूजनाचा मान ह.भ.प. सत्यवान महाराज महाडिक यांच्या हस्ते पार पडला. त्यानंतर परमपूज्य सदगुरु आनंददादा महाराज मोरे यांचे पादपूजन रायगड जिल्हा परिषदचे सभापती आणि मोरे माऊली संप्रदायाचे कार्याध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी सपत्नीक केले.

यावेळी सदगुरू दादा महाराज मोरे यांनी, देशभरात अनेक अनाथाश्रम आहेत; मात्र पोलादपूर तालुक्यात एकही अनाथाश्रम नाही आणि तो निर्माण होऊ देणार नाही. समाजाने अनाथांना मुलांना आपले मानून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन केल्यानंतर उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. यावेळी रायगड जिल्हा परिषद सभापती तथा संप्रदायाचे कार्याध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी, मोरे माऊली संप्रदायाची व्याप्ती आज राज्यभर वाढली असून हजारो शिष्य समाजहिताची विविध कार्ये करत आहेत, असे सांगितले. मोरे माऊली संस्थानचे सचिव लक्ष्मण मोरे यांनी, परमपूज्य दादा महाराज मोरे यांनी सुरू केलेली सेवा जोपर्यंत चंद्र, सूर्य आणि तारे आहेत तोपर्यंत अखंड सुरू राहील, असा संकल्प केला आहे. पंढरपूर येथील मोरे माऊली मठाचा लोकार्पण सोहळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला असून त्या ऐतिहासिक क्षणाचे सर्व साधक साक्षीदार आणि भाग्यवान असल्याचे सांगितले. यानंतर वासुदेव पवार, लक्ष्मण महाराज खेडेकर, खेड येथील शेलार आदी विविध मान्यवरांनी मनोगतं व्यक्त केली. यावेळी सद्‍गुरू दर्शन सोहळा, भजन-कीर्तन आणि महाप्रसादाचा कार्यक्रम भाविकांच्या शिस्तबद्ध गर्दीत झाला.


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे वाटपपत्र/ करारनामा प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनिशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| १ | तळोजा ८०१ | पेंधर १/२००८ | १७/३ | ०-१२-० | १०५० चौ.मी. | भूखंड क्र.१८, सेक्टर-१६, क्षेत्र-१०५० चौ.मी. | कै.परशुराम उंदऱ्या पाटील (मयत) यांचे वारस १) श्री.जनार्दन परशुराम पाटील २) श्री.भाऊ परशुराम पाटील ३) श्री.राजू परशुराम पाटील ४) श्री.अरूण परशुराम पाटील ५) श्री.श्याम परशुराम पाटील ६) श्री.शरद परशुराम पाटील ७) श्रीमती. चंद्रभागा मारूती भोईर ८) श्रीमती. निर्मला जनार्दन पोरजी ९) कै.आनंदीबाई बाळकृष्ण पाटील (मयत) यांचे वारस ९.१) सुनिता बाळकृष्ण पाटील उर्फ सुनिता ज्ञानेश्वर दमडे ९.२) संतोष बाळकृष्ण पाटील ९.३) रूपेश बाळकृष्ण ९.४) रतन बाळकृष्ण पाटील १०) द्रौपदीबाई ज्ञानदेव चौधरी | निरंक |
| | | | २०/१ | ०-०९-० | | | | |
| | | | २०/२ | ०-११-० | | | | |
| | | | २०/४ | ०-३७-२ | | | | |
| | | | २०/७ | ०-११-० | | | | |
| | | | २०/८ | ०-४०-९ | | | | |
| | | | एकूण क्षेत्र | ०-६०-० | | | | |
| २ | तळोजा १०८५ | पेंधर १/२००८ | २५४/१A | ०-२५-८ | २५० चौ.मी. | भुखंड क्र.२६, सेक्टर-९, क्षेत्र-२५० चौ.मी. | श्री.गजानन शंकर पाटील | - |
| | | | एकूण क्षेत्र | ०-२५-८ | | | | |
| ३ | टेंभोडे | ९२ | ३/२ब | ०-१७-० | १५० चौ.मी. | भूखंड क्र. ७०बी, सेक्टर-२२, क्षेत्र १५० चौ.मी. रोडपाली नोड | कै. मंगळी कृष्णा म्हसकर (मयत) यांचे वारस १) कै. लक्ष्मण गणपत म्हसकर (मयत) यांचे वारस १.१) श्री. मनोहर लक्ष्मण म्हसकर, २) श्री. दशरथ तुकाराम म्हसकर ३) श्री. ज्ञानेश्वर चांगा म्हसकर | निरंक |
| ४ | तळोजा ७१८ | तळोजा-पाचनंद ३७/३२४ | ६५/१अ | ०-३१-४ | २५० चौ.मी. | भुखंड क्र.७८, सेक्टर-५, क्षेत्र-२५० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. पवल-२/२८७०/२०२६ हे हक्कसोडपत्र प्रमाणे **१) जगदीश रघुनाथ पगडे उर्फ कोळी २) राजेंद्र पुंडलिक पगडे उर्फ कोळी ३) रमेश लक्ष्मण पगडे उर्फ कोळी ४)भाविक संजय पगडे उर्फ कोळी (अ.पा.क) संजना संजय पगडे उर्फ कोळी** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. | - |
| | | | एकूण क्षेत्र | ०-३१-४ | | | | |
| ५ | तळोजा १०१ | पेंधर २७० | २४१/१ | ०-७६-६ पैकी ०-४२-१ | ३५० चौ.मी. | भुखंड क्र.४१A, सेक्टर-२०, क्षेत्र-३५० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. पवल-१६६७४/२०२२ हे हक्कसोडपत्र प्रमाणे **१) श्री. मोहन गणा पाटील २) श्री. एकनाथ गणा पाटील ३) श्री. उदय गणा पाटील** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. | - |
| | | | एकूण क्षेत्र | ०-४२-१ | | | | |
| ६ | तळोजा ४१८ | तळोजा-पाचनंद १०६/१२३ | ७५/४ | ०-०२-० | ६५० चौ.मी. पैकी ५० चौ.मी. | भुखंड क्र.४३, सेक्टर-१७, क्षेत्र-५० चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-३, दस्त क्र. पवल-३/७२२०/२०२६ हे हक्कसोडपत्र प्रमाणे **श्री. जगदीश दत्तात्रेय घरत** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. | - |
| | | तळोजा-पाचनंद २७ | ९६/१+४ | ०-७०-० | | | | |
| | | | एकूण क्षेत्र | ०-७२-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण/पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/१६६/२०२६-२७**

# भिवंडी दुर्घटनेनंतर नवी मुंबई पालिका सतर्क

## ३४ अतिधोकादायक इमारती रिकाम्या करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भिवंडीत धोकादायक इमारतीचा भाग कोसळून १० जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर राज्यभरातील प्रशासन सतर्क झाले आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महापालिकेने शहरातील सी-१ प्रवर्गातील ३४ अतिधोकादायक इमारती तातडीने रिकाम्या करण्याचे जाहीर आवाहन केले आहे.



या इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या मालक, भोगवटादार आणि व्यावसायिकांनी त्वरित स्थलांतर करून निवासी व व्यावसायिक वापर बंद करावा, अन्यथा कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधितांवर राहील, असा स्पष्ट इशारा महापालिकेने दिला आहे. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने २०२६-२७ मधील अतिधोकादायक सी-१ इमारतींची यादी प्रसिद्ध केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या ५ नोव्हेंबर २०१५ च्या शासन परिपत्रकानुसार या इमारती निवासी व व्यावसायिक वापरासाठी धोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. संबंधितांना यापूर्वीच लेखी नोटिसा देण्यात आल्या असून इमारती रिकाम्या करून त्या पाडण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या म्हणण्यानुसार या इमारतींचा वापर सुरू राहिल्यास कोणत्याही क्षणी इमारत कोसळून जीवित आणि वित्तहानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधितांनी तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. तसेच सी-१ प्रवर्गातील इमारतींची वीज आणि पाणी जोडणी खंडित करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. महापालिकेने स्पष्ट केले आहे की, वारंवार सूचना देऊनही इमारतींचा वापर सुरू ठेवल्यास आणि त्यातून दुर्घटना घडल्यास त्यासाठी संबंधित मालक, भोगवटादार किंवा वापरकर्ते स्वतः जबाबदार राहतील. अशा परिस्थितीत महापालिका जबाबदार राहणार नाही.

यंदाच्या यादीत बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, ऐरोली आणि दिवा विभागांतील एकूण ३४ इमारतींचा समावेश आहे. त्यामध्ये गणेश को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, पंचशील अपार्टमेंट, सायलेंट व्हॅली, पुनित पार्क, महाराष्ट्र हाऊसिंग सोसायटी, हॅपी होम, प्रगती, वसंत विहार, प्रितीसंगम, अमोली, पार्क व्ह्यू, श्री विनायक, सातकृपा, गगनगिरी, चंद्रलोक, सिल्व्हर नेस्ट, सिटी गार्डन, राज पॅलेस, सहजीवन अपार्टमेंट या निवासी इमारतींसह तुर्भे येथील कांदा-बटाटा बाजार आणि मसाला बाजारातील काही इमारतींचाही समावेश आहे.

गेल्या काही वर्षांत पावसाळ्यात राज्यातील विविध भागांत धोकादायक इमारती कोसळून अनेक दुर्घटना घडल्या आहेत. शुक्रवारी भिवंडीत घडलेल्या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना धोकादायक इमारतींबाबत कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार नवी मुंबई महापालिकेनेही नागरिकांना सावध करत अतिधोकादायक इमारती तातडीने रिकाम्या करण्याचे आवाहन केले आहे.

# दहीहंडीतील जखमींवर मोफत उपचार करावेत -आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

गोकुळाष्टमी व दहीहंडी उत्सवादरम्यान गोविंदा पथकांमध्ये सहभागी होणाऱ्या बालगोपाळांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांना दुखापत झाल्यास नवी मुंबईतील सर्व शासकीय, महापालिका तसेच खासगी रुग्णालयांनी तत्काळ आणि मोफत उपचार उपलब्ध करून द्यावेत, अशी विनंती बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी केली आहे.



दहीहंडी उत्सवादरम्यान मानवी मनोरे रचताना लहान मुलांना किरकोळ किंवा गंभीर दुखापती होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत उपचारासाठी कोणताही विलंब होऊ नये आणि पालकांवर आर्थिक भार पडू नये यासाठी सर्व रुग्णालयांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पुढाकार घ्यावा, असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी केले आहे. यासाठी एमजीएम हॉस्पिटल सानपाडा, तेरना हॉस्पिटल नेरुळ, अपोलो हॉस्पिटल, एमजीएम हॉस्पिटल सीबीडी बेलापूर, नवी मुंबई महापालिका रुग्णालय वाशी, एमपीसीटी हॉस्पिटल सानपाडा, एमजीएम हॉस्पिटल वाशी, डी.वाय.पाटील हॉस्पिटल नेरूळ, न्यू मिलेनियम हॉस्पिटल सानपाडा या रुग्णालयांना मोफत उपचारासाठी पत्र देण्यात आले आहे.

आपत्कालीन वैद्यकीय सेवा सज्ज ठेवणे, आवश्यक डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि जखमी बाल गोविंदांवर तातडीने उपचार करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. गोकुळाष्टमी हा आनंद, उत्साह आणि सामाजिक ऐक्याचा सण आहे. हा उत्सव सुरक्षित वातावरणात पार पडावा व कोणत्याही बालगोपाळाला उपचाराअभावी त्रास सहन करावा लागू नये यासाठी रुग्णालयांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षाही आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केली.

# शिक्षक गुणगौरव पुरस्कार समितीवर डॉ. अनिल पाटील

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवलीचे माजी प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांची क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२५-२६साठी जिल्हाधिकारी रायगड यांचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली आहे. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकानुसार रायगड जिल्ह्यातील उपक्रमशील प्राथमिक, माध्यमिक, आदिवासी, दिव्यांग व कला-क्रीडा शिक्षकांकडून ऑनलाइन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.



प्राप्त प्रस्तावांची छाननी आणि मुलाखतीसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीवर उपक्रमशील आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षक डॉ. अनिल पाटील यांची निवड झाल्याने रसायनी परिसर आणि खालापूर तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. यापूर्वीही डॉ. अनिल पाटील यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड यांचे प्रतिनिधी म्हणून दोन वेळा निवड करण्यात आली होती. निस्वार्थ आणि निरपेक्ष भावनेने काम केल्यामुळेच आपली निवड होते, असे मत डॉ. अनिल पाटील यांनी व्यक्त केले आहे.

# नवी मुंबईतील एसआयआर कामाचा जिल्हाधिकारी, आयुक्तांकडून आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण म्हणजेच एसआयआर कार्यक्रमाला मुदतवाढ मिळाल्याने आता ८ ऑगस्टपर्यंत ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नोकरदार नागरिकांना सुविधा व्हावी यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार शनिवार १ ऑगस्ट ते सोमवार ३ ऑगस्ट या कालावधीत नवी मुंबईतील १५० ऐरोली आणि १५१ बेलापूर या दोन्ही मतदारसंघात १७३ ठिकाणी विशेष कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत.



या कॅम्पना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी ऐरोली आणि बेलापूर या दोन्ही मतदारसंघांचा स्वतंत्र आढावा घेतला. एसआयआर प्रक्रियेला आता काहीच दिवस शिल्लक असल्याने कामाला अधिक गती देऊन प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी सुनील पवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, १५० ऐरोलीच्या मतदार नोंदणी अधिकारी प्रिती पाटील आणि १५१ बेलापूरच्या मतदार नोंदणी अधिकारी अश्विनी पाटील तसेच सर्व सहा. मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी सहा. मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून झालेल्या कामाचा अधिकारीनिहाय आढावा घेतला. ज्या अधिकाऱ्यांची कामाची टक्केवारी कमी आहे त्यांच्याकडून त्याची कारणे जाणून घेतली. विहित कालावधीत काम पूर्ण करणे आवश्यक असल्याने उर्वरित कालावधीसाठी बीएलओनिहाय मायक्रोप्लॅनिंग करून नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी एसआयआरचे काम करणाऱ्या महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ८ ऑगस्टपर्यंत केवळ हेच काम करावे, असे स्पष्ट केले. सोमवारपासून आठही विभागांतील एसआयआर कामाची ते प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करणार आहेत.

गणनापत्रे वितरित करण्याइतकेच त्यांचे संकलन आणि संकलित फॉर्मचे बीएलओंकडून डिजिटायझेशन करणे महत्त्वाचे असल्याचे सांगून याला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रत्येक सहा. मतदार नोंदणी अधिकाऱ्याने आपल्या अधिनस्त बीएलओच्या कामाचा दैनंदिन आढावा घेऊन नोंद ठेवावी. कामात मागे असलेल्या बीएलओंना कामाचा वेग वाढविण्यासाठी प्रोत्साहित करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. मतदारांची नावे वगळताना काळजीपूर्वक छाननी करावी. Photo Similar Entry आणि Non Standard Photo या बाबींकडे विशेष लक्ष द्यावे. तसेच नवी मुंबईत सुरू असलेल्या इमारतींच्या पुनर्विकासातील मतदारांची नीट पडताळणी करून त्यांच्याकडून विशिष्ट फॉर्म भरून घ्यावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

सहा. मतदार नोंदणी अधिकारी हा बीएलओच्या कामावर नियंत्रण ठेवणारा महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व विविध सामाजिक घटकांचे सहकार्य घ्यावे. समाजातील मान्यवर व्यक्तींची एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली आहे का, याची खातरजमा करावी, असेही सांगण्यात आले. पुढील आठवडाभरात उद्दिष्ट पूर्ण करण्याचे नियोजन करावे. या कामात कोणताही हलगर्जीपणा आढळल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा देत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबईत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अंतर्गत संयुक्त मोहिमा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छता आणि आरोग्य या परस्परपूरक गोष्टी असून 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' अंतर्गत स्वच्छ भारत मिशनमार्फत जाहीर करण्यात आलेल्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेत आठवडाभर संयुक्त मोहिमा राबविण्यात येत आहेत. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार ३० जुलै ते ५ ऑगस्ट या कालावधीत आरोग्य विभाग आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम सुरू आहे.




या मोहिमेच्या अनुषंगाने दि. ३० जुलै रोजी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली मोहीम राबविण्यात आली. तसेच सहा. आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, मुख्य स्वच्छता अधिकारी राजुसिंह चव्हाण आणि नरेश अंधेर यांच्या नियोजनानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २६ नागरी आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात स्वच्छता व आरोग्य विशेष मोहीम राबविण्यात आली.

ही मोहीम संभाजी नगर, करावेगांव, से-४८ ए, गांधीनगर, नेरुळगांव, बांचोली मैदान ते शांघाई हॉटेल, सारसोळे गांव, शिरवणेगांव, सानपाडा गांव, तुर्भेगांव, श्रमिकनगर खालची व वरची झोपडपट्टी, हनुमान नगर, जुहूगाव, पोलीस पाटील चाळ ते शाळा क्रमांक २७ ते आर के भगत बिल्डींग वाशीगांव, खैरणेगाव, महापेगांव, समर्थनगर, गांवदेवी वाडी, चिंचआळी पूर्ण, से-१०ए, कातकरीपाडा, छत्रपती रहिवासी संघ, यादवनगर, समतानगर, विष्णुनगर, नोसीलनाका, घणसोली गाव, कोपरखैरणे गाव या भागांमध्ये राबविण्यात आली.

तुंबलेली गटारे स्वच्छ करणे, डासअळीनाशक फवारणी करणे तसेच उंदीर/घुशींचा उपद्रव असलेल्या ठिकाणी औषध टाकून मूषक नियंत्रणाची कार्यवाही करण्यात आली.

# सराफाकडून २३ ग्राहकांची एक कोटींची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोलीत एका सराफाने ग्राहकांचा विश्वास संपादन करून २३ ग्राहकांना एक कोटी पाच लाख रुपयांना गंडवल्याचे उघडकीस आले आहे. नवे दागिने तयार करून देण्याच्या नावाखाली आगाऊ रक्कम तसेच मोड करण्यासाठी दिलेले सोन्याचे दागिने घेऊन सोनार दाम्पत्याने पलायन केल्याची तक्रार दाखल झाली आहे. याप्रकरणी रबाळे पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. मुख्य म्हणजे पोलीस तपास करत असून फसवणूक केलेल्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

सेक्टर ३ येथील भवानी ज्वेलर्सचे चालक करणसिंह राजपुरोहित आणि त्यांची पत्नी ममता राजपुरोहित यांनी ग्राहकांकडून नवे दागिने बनवून देण्यासाठी आगाऊ रक्कम स्वीकारली, तर अनेकांकडून जुने दागिने घेतले, मात्र दागिने न देता आणि घेतलेली रक्कम परत न करता दोघांनी दुकान बंद करून पलायन केल्याचा आरोप आहे.

# वासांबे ग्रामपंचायतीला राज्यस्तरीय आदिशक्ती पुरस्कारात द्वितीय क्रमांक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने जाहीर केलेल्या सन २०२५-२६ च्या "आदिशक्ती पुरस्कारा"त खालापूर तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींनी राज्यात मानाचे स्थान पटकावले आहे. यामध्ये कुंभिवलीला प्रथम, वासांबे (मोहोपाडा) द्विवतीय आणि साजगावला तृतीय क्रमांक मिळाला आहे.

महाराष्ट्र शासनाने ३१ जुलै रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार "आदिशक्ती अभियान" प्रभावीपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. महिला सक्षमीकरण, बालविकास, आरोग्य, शिक्षण व सामाजिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींचा यात समावेश आहे. राज्यस्तरीय पुरस्कारात खालापूर तालुक्यातील कुंभिवली ग्रामपंचायतीला प्रथम, वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीला द्विवतीय आणि साजगाव ग्रामपंचायतीला तृतीय क्रमांक जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे खालापूर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



महिला व बालकल्याण क्षेत्रात सातत्याने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांना राज्य शासनाने दिलेली ही मोठी दाद मानली जात आहे. या यशाबद्दल संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, महिला बचत गट तसेच ग्रामस्थांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करून ग्रामीण विकासाचा आदर्श निर्माण करणाऱ्या ग्रामपंचायतींचे कौतुक होत आहे.



**नवी मुंबई : थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच समाज परिवर्तनाला चालना देणारे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून या दोन्ही महामानवांच्या प्रतिमेस उपमहापौर दशरथ भगत यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करून नवी मुंबई महापालिका मुख्यालयात अभिवादन करण्यात आले. मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे संपन्न प्रतिमा पूजनप्रसंगी प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे आणि इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.**

# माजी आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त सानपाड्यातील सोनखार येथे सामाजिक उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

माजी आमदार संदीप नाईक यांच्या ४ ऑगस्ट रोजी असलेल्या जन्मदिनानिमित्ताने प्रभाग क्र. १८मधील भारतीय जनता पक्षाच्या निशांत भगत व प्रिती संदीप भगत या नगरसेवकांच्या पुढाकाराने नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन सोनखार, सानपाडा येथे करण्यात आले आहे.

प्रभागातील नागरिकांना शासनाच्या थेट लाभ मिळणाऱ्या सेवा ज्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना शासनाचे ज्येष्ठ नागरिक सवलत ओळखपत्र, नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन सेवेच्या बसमधून मोफत प्रवास सवलत कार्डचे वाटप करण्यात येणार आहे. सोबतच प्रभागातील १०वी-१२वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, एसआयआर मोहिमेत नागरी सेवेतील शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या निवडणूक विभाग नियुक्त बीएलओंचा तसेच प्रभागातील सानपाडा-सोनखार (पामबीच)मधील सर्व सोसायटीनिहाय असलेल्या समन्वयक यांचा सन्मान यानिमित्ताने करण्यात येणार असल्याचे उपक्रमाचे संयोजक संदीप भगत यांनी कळविले आहे.

ॲम्फी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, सेक्टर १ ते १५, ब्रीजखाली, सोनखार, सानपाडा-पामबीच येथे आयोजित या उपक्रमात ज्येष्ठ नागरिक, बीएलओ आणि सोसायटी समन्वयक यांना उपमहापौर दशरथ भगत यांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे. कार्यक्रमास नगरसेविका दयावती शेवाळे, माजी नगरसेविका फशीबाई भगत, वैजयंती भगत व रुपाली भगत उपस्थित राहणार आहेत, असे आयोजक नगरसेवक निशांत भगत व नगरसेविका प्रिती भगत यांनी सांगितले आहे.

# चौलच्या श्री मुखरी गणपती मंदिरात संकष्ट चतुर्थीनिमित्त भाविकांची गर्दी

## असंख्य भक्तांनी घेतले श्रींचे दर्शन; वातावरण भक्तिमय

**रेवदंडा : प्रतिनिधी**

संकष्ट चतुर्थीच्या पावन पर्वानिमित्त चौल येथील जागृत व श्रद्धास्थान असलेल्या श्री मुखरी गणपती देवस्थानात रविवारी पहाटेपासूनच भाविकांची अलोट गर्दी उसळली. परिसरातील हजारो भाविकांनी श्री गणरायाचे दर्शन घेऊन आपल्या मनोकामना व्यक्त करत सुख, समृद्धी व आरोग्यासाठी प्रार्थना केली.



दिवसभर मंदिर परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. संकष्ट चतुर्थीला गणपती उपासनेला विशेष महत्त्व असल्याने दिवसभर मंदिर परिसर भक्तांनी फुलून गेला होता. पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. भाविकांना कोणताही त्रास न होता शांततेत दर्शन घेता आले.

यावेळी श्री गणरायाच्या मूर्तीला विविधरंगी फुलांचे हार, दुर्वा आणि पारंपरिक अलंकारांनी सजविण्यात आले होते. श्रींच्या मनमोहक रूपाचे दर्शन घेताच भाविक भारावून जात होते.मंदिराबाहेर पूजेचे साहित्य, फुलांचे हार, दुर्वा, नारळ, प्रसाद आणि इतर धार्मिक वस्तूंची दुकाने सजली होती. भाविकांनी दर्शनासह प्रसादाचा लाभ घेत संकष्टीचे व्रत पूर्ण केले. अनेक कुटुंबांनी लहान मुलांसह मंदिरात उपस्थित राहून श्रींचे आशीर्वाद घेतले. संपूर्ण दिवस मंदिर परिसरात भक्तांचा ओघ अखंड सुरू राहिला.

संकष्ट चतुर्थीनिमित्त चौलच्या श्री मुखरी गणपती देवस्थानात भक्तीभाव, श्रद्धा आणि धार्मिक उत्साहाचे दर्शन घडले चौलच्या श्री मुखरी गणपती मंदिरात दिवसभर भक्तांचा ओघ कायम राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# माणगावमधील पत्रकार मित्र परिवाराकडून शैक्षणिक साहित्य वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील पत्रकार मित्र परिवाराच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या वर्षात तालुक्यातील विविध प्राथमिक शाळांमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

रायगड जिल्हा परिषद शाळा जुने माणगाव, सुरव तर्फे तळे, सुरव तर्फे निजामपूर, उमरोली तर्फे खरवली, महादपोली आदिवासीवाडी, निवी आदिवासीवाडी, माकटी आदिवासीवाडी आणि उच्च प्राथमिक शाळा दाखणे या शाळेतील सुमारे १२० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये तीन विषयांच्या वह्या, पेन, पेन्सिल, रबर, गिरमीट, चित्रकला वही, स्केचिंग पेन, स्कूल बॅग आदी साहित्यांचा समावेश होता.

या कार्यक्रमासाठी पत्रकार मित्र परिवाराचे सदस्य प्रमोद जाधव,परेश, शिंदे, गिरीश गोरेगावकर, वैभव सत्वे, सुनिल दळवी, नचिकेत म्हापसेकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या वाटपाचा मुख्य आणि शेवटचा कार्यक्रम रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दाखणे या शाळेत झाला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अजय मेहता आणि गटशिक्षण अधिकारी सुरेखा तांबट उपस्थित होते, तर त्यांच्यासह उतेखोल बीटचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे व दाखणे शाळेचे केंद्रप्रमुख उभारे व शिक्षक वृंद, पालकवर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी या कार्यक्रमाला सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यासाठी ज्या दानशूर व्यक्तींनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मदतीचा हातभार लावला त्या सर्वांचे पत्रकार प्रमोद जाधव यांनी धन्यवाद व्यक्त केले. अशा पद्धतीने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर अनोखे हास्य फुलवणारा या वर्षीचा हा शैक्षणिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# बामणोली रोड येथे गरजू ग्रामस्थांना छत्रीवाटप

**माणगाव : बातमीदार**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बामणोली रोड, वॉर्ड क्रमांक १२मधील ग्रामस्थांची गैरसोय होऊ नये या सामाजिक भावनेतून राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांच्यातर्फे छत्री वाटपाचा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या उपक्रमांतर्गत वॉर्ड क्र. १२ मधील नागरिक व गरजू कुटुंबांना मोफत छत्र्यांचे वाटप करण्यात आले. पावसाळ्यात दैनंदिन कामांसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना, विशेषतः ज्येष्ठांना या वाटपामुळे मोठा दिलासा मिळाला असून, स्थानिक ग्रामस्थांनी या उपक्रमाबद्दल ना. गोगावले यांचे विशेष आभार व्यक्त केले.



कार्यक्रमाला शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होतीः प्रसाद धारिया (शिवसेना संपर्कप्रमुख, माणगाव शहर, दीप जाधव (शाखाप्रमुख), सोहम हतीसकर (उपशाखाप्रमुख), कैलास जावरे यांच्यासह परिसरातील इतर सर्व ज्येष्ठ व तरुण शिवसैनिक उपस्थित होते.

जनतेच्या अडीअडचणीत नेहमी पाठीशी उभे राहणे हीच शिवसेनेची परंपरा आहे. ना. भरत गोगावले यंच्या मार्गदर्शनाखाली आमचा हा सामाजिक सेवायज्ञ असाच अविरत सुरू राहील, असा विश्वास या प्रसंगी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे संयोजन आणि नियोजन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.

# माणगाव विवा कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव येथील विवा कॉलजमध्ये गुरुपौर्णिमा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमास पोलीस निरीक्षक संजय बांगर, भाजप दक्षिण रायगड युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे, संस्थेचे संस्थापक विवेक ढेपे आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गुरूंचे स्थान व त्यांचे महत्त्व सांगताना विद्यार्थ्यांनी आपण मोठे झाल्यावर विविध क्षेत्रात भरारी घेतल्यावर आपल्याला ज्या शाळा व कॉलेजने तसेच शिक्षकांनी घडविले याची आठवण ठेवणे गरजेचे असल्याचे सांगत समाजसेवेचा संकल्प करण्याचे आवाहन केले. विभागप्रमुख प्रा.यश काळे यांनी विद्यार्थ्यांनी गुरूंच्या शिकवणुकीचा आदर्श स्वीकारून ज्ञान,शिस्त आणि सामाजिक मूल्यांची जोपासना करावी,असे आवाहन केले. प्राचार्य योगेश रानभरे यांनीही गुरूंची महती कथन केली.

# स्थानिक निधी लेखापरीक्षा दिनानिमित्त शालेय आणि जीवनावश्यक वस्तूंची मदत



**चौक : प्रतिनिधी**

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन अधिनस्त स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाचा दुसरा स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, अलिबाग यांच्या वतीने खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत दुरशेत अंतर्गत मौजे तुकसई येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.या अंतर्गत जिल्हा परिषद शाळा चिंबोडे व तुकसई येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच दरडग्रस्त तुकसई ठाकूरवाडी येथील आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंची वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

उत्कृष्ट लेखा आक्षेप नोंदविणाऱ्या लेखा परीक्षकांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये विजय फासे, प्रवीण पेडणेकर, ज्ञानेश्वर किसवे, रुपेश गोसावी आणि प्रवीण सावंत यांचा समावेश होता.

कार्यक्रमास स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग, रायगडचे सहायक संचालक विजय वाकचौरे, जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी विजय फासे, स्थानिक निधी लेखापरीक्षा कर्मचारी संघटना विभागीय सचिव ज्ञानेश्वर किसवे, ग्रुप ग्रामपंचायत दुरशेतचे माजी उपसरपंच समीर पांगारे, पोलीस पाटील सुधीर पांगारे, ज्येष्ठ नागरिक मारुती पांगारे, ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे, जिल्हा परिषद शाळा चिंबोडेचे मुख्याध्यापक ओवाळ, जिल्हा परिषद शाळा तुकसई मुख्याध्यापिका श्रीमती घोसाळकर तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दुर्गम भागात जाऊन सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन साजरा केल्याबद्दल ग्रामस्थांनी विभागाचे कौतुक केले.

# रासप भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक कोकळे

**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रीय समाज पक्षाच्या मध्य रायगड भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी सुकेळी (ता. रोहा) येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक विठ्ठल कोकळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रासपचे राज्य कार्यकारिणी सदस्य भगवान ढेबे यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली.



अशोक कोकळे यांचे सामाजिक कार्य, पक्षावरील निष्ठा, संघटन कौशल्य तसेच पक्षाची ध्येय-धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी असलेली तळमळ लक्षात घेऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

या पदाच्या माध्यमातून पक्ष संघटना अधिक बळकट करणे, नवीन सदस्य नोंदणी व सक्रिय सदस्य वाढविणे, पक्षाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे, सर्व समाजघटकांशी समन्वय साधणे तसेच राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांचे विचार जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्य करावे, अशा अपेक्षा पक्ष नेतृत्वाने व्यक्त केल्या आहेत.

ही नियुक्ती तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली असून पक्षाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास नियुक्तीत बदल अथवा रद्द करण्याचा अधिकार पक्ष नेतृत्वाकडे राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. नियुक्तीबद्दल पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध स्तरांतून कोकळे यांचे अभिनंदन होत आहे.

# रामेश्वर पुष्करणीत पोहण्याची धूम; हौशींची हाऊसफुल्ल गर्दी

**रेवदंडा : प्रतिनिधी**


चौल येथील ऐतिहासिक रामेश्वर पुष्करणीमध्ये सध्या पोहण्याची जोरदार धूम पाहायला मिळत आहे. विशेषतः शनिवार आणि रविवारी सकाळपासून सायंकाळपर्यंत पोहण्यासाठी लहान मुलांपासून युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी गर्दी होत असून परिसर अक्षरशः 'हाऊसफुल' झाल्याचे चित्र आहे.

सुट्टीच्या दिवशी कुटुंबासह अनेकजण रामेश्वर पुष्करणीत पोहण्याचा आनंद घेण्यासाठी येत आहेत. अनेक नवशिके येथे पोहण्याचे धडे घेत असून, अनुभवी पोहणारे त्यांना मार्गदर्शन करत आहेत. त्यामुळे पोहणे शिकणारे आणि शिकविणारे अशा दोघांचाही उत्साह वाढला आहे.

पोहण्यामुळे शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास आणि पाण्यातील सुरक्षिततेचे ज्ञान मिळत असल्याने पालकही आपल्या मुलांना मोठ्या संख्येने येथे घेऊन येत आहेत. नैसर्गिक वातावरण आणि ऐतिहासिक वारशाची पार्श्वभूमी लाभलेल्या या ठिकाणी सुट्टीच्या दिवशी असंख्य नागरिकांचा सहभाग पाहायला मिळत असून सर्वजण मनमुराद आनंद लुटताना दिसत आहेत.

स्थानिकांच्या मते, चौल रामेश्वर पुष्करणी ही आता केवळ ऐतिहासिक वास्तू न राहता, परिसरातील नागरिकांसाठी पोहण्याचे आणि विरंगुळ्याचे लोकप्रिय केंद्र बनली आहे. आठवड्याच्या शेवटी येथे वाढणारी गर्दी याचीच साक्ष देत आहे.





मुरूड : गोपाळवट परिसरातील डोंगरावरून पायऱ्यांच्या भातशेतीचे प्रसिद्ध छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेले मनमोहक छायाचित्र.

# आदिशक्ती अभियानात वाडगाव ग्रामपंचायत राज्यामध्ये अव्वल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या आदिशक्ती अभियान २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी निवड जाहीर करण्यात आली असून अलिबाग तालुक्यातील वाडगाव ग्रामपंचायतीने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



महिला व बाल विकास विभागाने ३१ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्य, जिल्हा आणि तालुकास्तरीय आदिशक्ती पुरस्कार घोषित करण्यात आले. राज्यस्तरीय स्पर्धेत कोकण विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वाडगाव ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळविला. तर सांगली जिल्ह्यातील येडेनिपाणी (ता. वाळवा) आणि कवठेपिराण (ता. मिरज) या ग्रामपंचायतींना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक जाहीर झाला आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरणासाठी राज्यभर आदिशक्ती अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य शासनाने आदिशक्ती पुरस्कार योजना सुरू केली आहे.

या यशामागे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग असल्याचे सांगितले जात आहे तसेच माजी सरपंच जयेंद्र भगत यांनीही योगदान दिले.

# बॉक्सिंगमध्ये भारताने रचला नवा इतिहास!

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल स्पर्धेत भारताच्या अंकुश पंघालने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. बॉक्सिंगमधील हे भारताचे सातवे सुवर्णपदक ठरले. या पदकासह भारताने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत नवा इतिहास रचला. आतापर्यंच्या इतिहासात कोणत्याच देशाला एका हंगामात बॉक्सिंगमध्ये एवढी सुवर्णपदके जिंकता आलेली नाहीत.



अंकुशने अंतिम सामन्यात इंग्लंडच्या दिमेजी शिट्टूचा पराभव केला. त्याने पहिला राऊंड गमावला होता, मात्र दमदार पुनरागमन करत त्याने फायनल बाजी मारली. सचिन सिवाचनंतर राष्ट्रकुल स्पर्धेत भारतासाठी सुवर्ण जिंकणारा तो दुसरा पुरुष बॉक्सर ठरला. याशिवाय महिला गटात प्रीती पवार, जैस्मिन लांबोरिया, साक्षी चौधरी, प्रिया घांगस आणि अरुंधती चौधरी यांनीही सुवर्णपदकांची कमाई केली.

अंकुश आधी सचिन सिवाच याने पुरुषांच्या ६० किलो गटात नामिबियाच्या ट्रायअगेन मॉर्नी न्देवेलोवर ३-२ अशा विभाजित निर्णयाने मात करत सुवर्णपदक जिंकले होते. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये पिछाडीवर असलेल्या सचिनने तिसऱ्या फेरीत प्रतिस्पर्ध्याला स्टँडिंग काउंटवर आणत सामना पलटवला.

बॉक्सिंगच्या क्रीडा स्पर्धेतील अंतिम दिवशी भारताच्या बॉक्सर्संनी पदकांची अक्षरशः बरसात केली. महिलांच्या ५१ किलो गटात साक्षी चौधरी, ५४ किलो गटात प्रीती पवार, ५७ किलो गटात जैस्मिन लांबोरिया, ६० किलो गटात प्रिया घांगस, ७० किलो गटात अरुंधती चौधरी यांनी सुवर्ण पदक पटकावले.

दुसरीकडे ऑलिम्पिक पदकविजेती लव्हलिना बोरगोहेन (महिला ७५ किलो), जादुमणी सिंग मांडेंगबाम (पुरुष ५५ किलो) आणि नरेंद्र बेरवाल (पुरुष +९० किलो) यांना अंतिम सामन्यात पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे त्यांना रौप्यपदकावर समाधान मानले.

याआधी इंग्लडने १९३४मधील लंडन येथील स्पर्धेत आणि २०१८मध्ये गोल्डकोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेत प्रत्येकी सहा सुवर्णपदके पटकावली होती. भारताने सात सुवर्णपदकांसह नवा इतिहास विक्रम प्रस्थापित करत अन्य कोणत्याही देशाला जमला नाही तो पराक्रम करुन दाखवला.

### राष्ट्रकुल स्पर्धेत जिंकली एकूण ३९ पदके

ग्लासगो येथील राष्ट्रकुल अर्थात कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धेत भारताने १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि नऊ कांस्य अशी एकूण ३९ पदके जिंकत पदक तालिकेत चौथे स्थान मिळवले आहे. यंदाच्या स्पर्धेत भारताने चमकदार कामगिरी केली. बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, अॅथलेटिक्स, पॅरा अॅथलेटिक्स, ज्युडो आणि पॉवरलिफ्टिंग अशा विविध खेळांमध्ये भारतीय खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. आता या क्रीडा महोत्सवाची २४वी आवृत्ती म्हणजेच २०२३चे राष्ट्रकुल खेळ भारतामधील ऐतिहासिक शहर असलेल्या अहमदाबाद येथे आयोजित केले जाणार आहेत.

# जीएसएल फायनलमध्ये गयाना वॉरियर्सचा थरारक विजय



**गयाना : वृत्तसंस्था**

टी-२० क्रिकेट हे सहसा फलंदाजांच्या स्फोटक खेळीसाठी ओळखले जात असले तरी ग्लोबल सुपर लीगच्या अंतिम सामन्यात गोलंदाजांचे वर्चस्व दिसून आले, ज्यामुळे सामना अविस्मरणीय ठरला. गयाना अमेझॉन वॉरियर्स आणि सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्स यांच्यातील विजेतेपदाच्या सामन्यात दोन्ही संघांना १०० धावांचा टप्पा गाठता आला नाही.

ग्लोबल सुपर लीग (जीएसएल)च्या अंतिम सामन्यात गयाना अमेझॉन वॉरियर्सने अवघ्या ८५ धावांचा बचाव करत सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्सचा सहा धावांनी पराभव केला आणि विजेतेपदावर नाव कोरले. कमी धावसंख्येचा यशस्वी बचाव करत वॉरियर्सने क्रिकेटप्रेमींना आश्चर्याचा धक्का दिला.

### ८५ धावांचा केला यशस्वी बचाव

प्रॉव्हिडन्स स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना गयाना अमेझॉन वॉरियर्सचा संपूर्ण डाव १८.५ षटकांत ८५ धावांत आटोपला. मॅथ्यू फोर्डेने सर्वाधिक २८ धावा केल्या, तर ड्वेन प्रिटोरियसने नाबाद १७ धावांचे योगदान दिले. सॅन फ्रान्सिस्कोकडून पीटर सिडल आणि अनिरुद्ध इमॅन्युएल यांनी प्रत्येकी तीन बळी घेत वॉरियर्सला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही.

८६ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्सची सुरुवात खराब झाली. संघाने सातत्याने विकेट्स गमावल्या. ऑलिव्हर पीकने ३१ धावांची झुंज दिली, मात्र त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. अखेर संपूर्ण संघ १८.३ षटकांत ७९ धावांत गारद झाला. गयानाच्या गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. प्रिटोरियस आणि मोहम्मद नबीने तीन, तर इम्रान ताहिरने दोन बळी घेत युनिकॉर्न्सच्या फलंदाजीचा कणा मोडला. निर्णायक क्षणी अचूक मारा करत वॉरियर्सने सामना आपल्या बाजूने फिरवला.

८५ धावांचा बचाव करून गयाना वॉरियर्सने टी-२० मध्ये फलंदाज नव्हे तर गोलंदाजही अनेकदा खरे सामना विजेते ठरतात हे सिद्ध केले. या सामन्यात अष्टपैलू कामगिरीबद्दल प्रिटोरियसला सामनावीर पुरस्कार देण्यात आला, तर संपूर्ण स्पर्धेतील सातत्यपूर्ण प्रदर्शनामुळे मोहम्मद नबीला मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले.

## तिलक वर्मा दुलीप ट्रॉफीत करणार नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या टी-२० संघाचा उपकर्णधार तिलक वर्मा याच्यावर बीसीसीआयने आणखी एक मोठी जबाबदारी सोपवली आहे. २३ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दुलीप ट्रॉफी २०२६ स्पर्धेत तो दक्षिण विभागाच्या संघाचे नेतृत्व करणार आहे, तर आंध्र प्रदेशचा रिकी भुई याची उपकर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

तिलक वर्मा गेल्या काही काळापासून भारताच्या टी-२० संघातील महत्त्वाचा खेळाडू असून अलीकडेच त्याच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारीही सोपवण्यात आली होती. त्याला आता दुलीप ट्रॉफीत कर्णधारपद देण्यात आल्याने भविष्यातील नेतृत्वासाठी बीसीसीआय त्याच्यावर विश्वास दाखवत असल्याची चर्चा रंगली आहे. दक्षिण विभागाच्या संघात करुण नायर यालाही स्थान देण्यात आले आहे. संघात अनुभवी यष्टीरक्षक एन. जगदीसन याचाही समावेश करण्यात आला आहे.

# राष्ट्रकुल 'डबल मेडलिस्ट' गुलवीरचा थक्क करणारा प्रेरणादायी प्रवास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताचा लांब पल्ल्याचा धावपटू गुलवीर सिंह याने इतिहास रचला. पुरुषांच्या ५००० मीटर शर्यतीत कांस्यपदक जिंकत त्याने स्पर्धेतील दुसरे पदक आपल्या नावावर केले. याआधी त्याने १०,००० मीटर शर्यतीत रौप्यपदक पटकावले होते. या कामगिरीसह ट्रॅक अँड फील्ड (अॅथलेटिक्स) प्रकारात एकाच राष्ट्रकुल स्पर्धेत दोन पदके जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला.

भारतीय जवान गुलवीरच्या या ऐतिहासिक यशामागे संघर्ष, जिद्द आणि चिकाटीची प्रेरणादायी कहाणी दडलेली आहे. नोकरीसाठी धावण्याच्या कसरतीपासून राष्ट्रकुलचा 'डबल मेडलिस्ट' होण्यापर्यंतचा त्याचा प्रवास थक्क करणारा आहे.

पुरुषांच्या ५००० मीटरची अंतिम शर्यत अत्यंत रोमांचक ठरली. गुलवीर सिंहने १३ मिनिटे २४.९५ सेकंद अशी वेळ नोंदवत तिसरे स्थान पटकावले. पदकासाठीची चुरस किती अटीतटीची होती याचा अंदाज यावरून येतो की, त्याने केनियाच्या कॉर्नेलियस केम्बोईला अवघ्या ०.०४ सेकंदांनी मागे टाकत कांस्यपदकावर नाव कोरले.




ग्लासगो २०२६ स्पर्धेतील गुलवीरने पुरुषांच्या १०,००० मीटर शर्यतीत २७ मिनिटे ४९.७८ सेकंद अशी वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले होते. राष्ट्रकुल स्पर्धेतील या शर्यतीत पदक जिंकणाराही तो पहिला भारतीय पुरुष धावपटू ठरला होता. त्यानंतर ५००० मीटर शर्यतीत कांस्यपदकाची कमाई करत त्याने दुहेरी पदकांसह नवा इतिहास रचला.

सैन्यात भरती झाल्यानंतर गुलवीरची पहिली पोस्टिंग अरुणाचल प्रदेशात झाली. तिथे त्याने सैन्यातील १२ किमी क्रॉस-कंट्री स्पर्धेत भाग घेत पहिला क्रमांक पटकावला. कोणतेही व्यावसायिक प्रशिक्षण किंवा विशेष सराव नसतानाही त्याने ही उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेमुळे त्याच्या आयुष्याला निर्णायक वळण मिळाले. त्यानंतर त्याची निवड पुण्यातील आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट येथे प्रशिक्षणासाठी झाली. सैन्यातील जबाबदाऱ्या सांभाळत कठोर आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर त्याने स्वतःच्या कौशल्याला नवी धार दिली. फेडरेशन कप अॅथलेटिक्स स्पर्धेतील १०,००० मीटर शर्यतीत कांस्यपदक जिंकत त्याने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

### अनवाणी धावण्याचा सराव

१ जून १९९८ रोजी उत्तर प्रदेशातील अलीगड जिल्ह्यातील सिरसा या छोट्याशा गावातील एका शेतकरी कुटुंबात गुलवीर सिंगचा जन्म झाला. लहानपणापासूनच भारतीय सैन्यात भरती होण्याचे स्वप्न त्याने उराशी बाळगले होते. नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या १६०० मीटर धावण्याच्या शारीरिक चाचणीची तयारी म्हणून तो अनवाणी धावण्याचा सराव करत असे. त्याच्या मेहनतीला अखेर २०१८मध्ये यश आले आणि भारतीय सैन्यात भरती होण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण झाले.

# जसप्रीत बुमराह श्रीलंका दौऱ्यातून बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंका दौऱ्यापूर्वीच भारतीय क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे या दौऱ्यावर जाऊ शकणार नाही. 'सेंटर ऑफ एक्सलन्स'कडून परवानगी न मिळाल्याने बुमराहला संघातून वगळण्यात आल्याची माहिती समोर आली आली आहे.


भारत आणि श्रीलंका यांच्यातील १५ ऑगस्टपासून कसोटी मालिका सुरुवात होत आहे. बीसीसीआयनेने मंगळवारी जाहीर केलेल्या संघात बुमराहला स्थान देण्यात आले होते, मात्र तो खेळू शकेल की नाही या संदर्भात साशंकता व्यक्त करण्यात आली होती. वृत्तानुसार बुमराहच्या डाव्या पायाच्या गुडघ्यात दुखापत झाली असून त्याला अद्यापही पूर्णपणे फिट असल्यासारखे वाटत नाही.

या वर्षी आशियाई खेळ, न्यूझीलंड दौरा आणि पुढील वर्षीच्या सुरुवातीला होणारी बॉर्डर-गावसकर ट्रॉफी यांसारख्या महत्त्वाच्या मालिका आहेत. त्यामुळे बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने बुमराहच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचा धोका न घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# तापाची तमा न बाळगता अरुंधती चौधरीचा 'सुवर्ण'पंच!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय बॉक्सर अरुंधती चौधरी हिने राष्ट्रकुल स्पर्धेत दमदार कामगिरी करत महिलांच्या ७० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. अंतिम सामन्यात तिने इंग्लंडच्या शँटेल रीड हिचा ५-० असा एकतर्फी पराभव केला. विशेष म्हणजे, आजारी असतानाही तिने रिंगमध्ये उतरून ही कामगिरी केली.



उपांत्य फेरीनंतर अरुंधतीला तीव्र ताप आला होता, मात्र अवघ्या काही तासांत स्वतःला सावरत ती अंतिम सामन्यासाठी सज्ज झाली. जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तिने अंतिम लढत जवळपास एकहाती जिंकत सुवर्णपदकावर नाव कोरले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत विजय मिळवण्याची तिची ही लढवय्या वृत्ती प्रत्येकाला प्रेरणा देणारी आणि तिला सलाम करायला लावणारी ठरली.

अरुंधतीने सुरुवातीपासूनच आक्रमक आणि संयमी खेळ करत सामन्यावर पकड ठेवली. पहिल्या फेरीत पाचपैकी चार पंचांनी तिच्या बाजूने निर्णय दिला. दुसऱ्या फेरीनंतर मात्र सर्व पाचही पंच अरुंधतीच्या बाजूने होते. अखेरच्या फेरीतही तिने सामन्याचा वेग पूर्णपणे आपल्या नियंत्रणात ठेवत इंग्लंडच्या बॉक्सरला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. निकाल जाहीर होण्यापूर्वीच अरुंधतीला आपल्या विजयाचा विश्वास होता आणि अखेरीस ५-० अशा एकमताच्या निर्णयाने तिने सुवर्णपदकावर नाव कोरले.

# पुरुषांच्या तिहेरी उडीत भारताचे दुहेरी यश

## प्रवीण चित्रावेलला रौप्य, तर सेल्वा प्रभूला कांस्यपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय अॅथलीट प्रवीण चित्रावेल आणि सेल्वा प्रभू थिरुमारन यांनी कॉमनवेल्थ गेम्समधील पुरुषांच्या तिहेरी उडी (ट्रिपल जंप) स्पर्धेत अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक पटकावत भारताला दुहेरी यश मिळवून दिले. भारताच्या खेळाडूंनी पुन्हा एकदा अजून एका क्रीडा प्रकारात दोन खेळाडूंनी पदकांची कमाई केली.

प्रवीणने आपल्या चौथ्या प्रयत्नात १६.५८ मीटर अशी सर्वोत्तम उडी मारत रौप्यपदकावर नाव कोरले, तर सेल्वा प्रभूने १६.५२ मीटरची सर्वोत्तम उडी घेत कांस्यपदकाची कमाई केली. स्पर्धेच्या पहिल्या तीन फेऱ्यांनंतर प्रवीण १६.०५ मीटरच्या पहिल्या प्रयत्नासह पाचव्या स्थानावर होता. त्यानंतर तिसऱ्या फेरीत त्याने १६.३१ मीटरची उडी घेत आपली कामगिरी उंचावली आणि चौथ्या प्रयत्नात १६.५८ मीटरची दमदार उडी मारत काही काळासाठी आघाडीही घेतली.

दुसरीकडे सेल्वा प्रभू थिरुमारन याने दुसऱ्या प्रयत्नात १६.१७ मीटरची उडी मारत कांस्यपदकाच्या शर्यतीत स्थान मिळवले. त्यानंतर तिसऱ्या फेरीत त्याने १६.४३ मीटरची उडी घेतली आणि अखेरीस १६.५२ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह कांस्यपदक पटकावले. या दुहेरी पदकांमुळे ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्समधील अॅथलेटिक्स स्पर्धेत भारताची दमदार कामगिरी आणखी अधोरेखित झाली.

## सुभाष पाटील यांचा पनवेल महापालिकेतर्फे सत्कार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र तायक्वांडो संघटनेचे सहसचिव तथा आंतरराष्ट्रीय तायक्वांडो तांत्रिक अधिकारी सुभाष पाटील यांनी नुकत्याच हैदराबाद येथे पार पडलेल्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेत चॅम्पियनशिप डायरेक्टर म्हणून अत्यंत यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अखिल भारतीय पोलीस क्रीडा संघटनेतर्फे श्री. पाटील यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. यापूर्वीही त्यांनी काश्मीर येथे पार पडलेल्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेचे यशस्वी नियोजन व संचालन करून आपल्या कार्याची छाप पाडली होती.

राष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच महिला व बालविकास सभापती ममता म्हात्रे यांच्या हस्ते सुभाष पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास नगरसेवक विकास घरत, प्रदीप भगत उपस्थित होते.

यावेळी महापौर नितीन पाटील म्हणाले, पनवेलमधील एक व्यक्ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तायक्वांदो क्षेत्रात अत्यंत जबाबदारीने कार्य करत असून निष्पक्ष आणि निस्वार्थ सेवेद्वारे देशभरातील खेळाडूंना न्याय मिळवून देत आहे, ही आपल्या शहरासाठी अभिमानाची बाब आहे. सुभाष पाटील यांची सातत्यपूर्ण प्रगती पनवेल तसेच रायगड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उंचावत आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com